**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १२० रविवार, दि. २२ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी, ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सितीराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334


## संमिश्र

### देवेंद्र फडणवीस योगीच, ते ध्यान करतात : सौ. फडणवीस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** देवेंद्रजी हे योगीच आहेत. ते कधीच कसरत करत नाही. पण ध्यान धारणा करत असतात. एक दिवस फोटो काढण्यापूरता नाही तर रोज योग करावा असे अमृता फडणवीस यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने बोलताना म्हटले आहे. अमृता फडणवीस पुढे बोलताना म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुळे जगभरातील लोकांना योगाचे महत्त्व कळले आहे. याच दृष्टीने पुढे जात मुंबई मनपाच्या सहाय्याने आम्ही योग शिबिर आयोजित केले आहे. यात मनपाचे १ हजारांहून अधिक सफाई कामगार येथे आले असून आम्ही त्यांना योग शिकवत आहोत. यापुढेही वेगवेगळी प्रशिक्षण शिबिरे घेणार आहोत.

### लाडक्या बहिणींना १ लाखांचे कर्ज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या मुंबईतील महिलांना शून्य टक्के व्याजराने तब्बल १ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय मुंबई बँकेने घेतला आहे. मुंबै बँकेचे अध्यक्ष तथा भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी ही माहिती दिली आहे. बँकेने मुंबई महापालिका निवडणुकीच्या ऐन तोंडावर हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्याचा मोठा लाभ सत्ताधारी महायुतीला मिळण्याची शक्यता आहे.

### आरोग्यमंत्र्यांसमोरच अधिकाऱ्यांमध्ये वाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कोल्हापूर येथील राज्य कामगार विमा महामंडळ रुग्णालयात (ईएसआयसी) अचानक भेट दिली आणि रुग्णालयातील वास्तव सम ोर आले. या रुग्णालयाची स्थापना केंद्र सरकारकडून कोल्हापूरसह इतर पाच राज्यांसाठी करण्यात आली असून सुद्धा या रुग्णालयात केवळ ३० बेड असलेली सुविधा बघून आरोग्यमंत्र्यांनी येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

### सिंधुदुर्ग अपघातात चौघांचा जागीच मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील नारिंग्रे गावाजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात रिक्षातील चौघांचा जागीच मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी झाला आहे.




# सीईओ साहेब, प्रशासनाची प्रतिमा सांभाळा

## साहेब, एकाच टेबलावर वतनदार झालेले आता तरी हटवा हो

### जिल्हा परिषदेतून लाचखोरी हद्दपार होणार?

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर : लाचप्रकरणात एका मागून एक अधिकारी व कर्मचारी अडकण्याच्या घटना आता जिल्हा परिषदेसह पंचायत समित्यांमध्ये घडू लागलेल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाची समाजातील प्रतिमा मलीन होत चालली आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी विशेष लक्ष देणे गरजेचे ठरणार आहे. 'म्हतारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावला नाही पाहिजे' या म्हणीप्रमाणे आता जिल्हा परिषद प्रशासनाने कामकाज करण्याची गरज निर्माण झालेली आहे.**

लाच घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. तो भारताच्या कायद्यानुसार शिक्षेस पात्र आहे. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ नुसार, कोणताही सरकारी अधिकारी किंवा लोकसेवक जर स्वत:साठी किंवा इतर कोणासाठी लाच घेतो, तर तो एक गंभीर गुन्हा ठरतो. या गुन्ह्यात कमीत तीन किंवा सात वर्षांपर्यंत शिक्षण होऊ शकते. दंड किंवा शिक्षा अशीही शिक्षा होवू शकते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे सर्वच शासकीय निमशासकीय कार्यालयांमध्ये लाच घेणे गुन्हा आहे. लाच घेणाऱ्यांवर गुन्हा दाखल केला जाईल. तसेच कोणी लाच मागितली तर संपर्क साधावा, असे सूचना फलक लावून समाज प्रबोधन केले जात आहे. असे असतानाही लाच घेण्याचे प्रकरणे समोर येत आहे. त्यामुळे समाजाबरोबर अधिकाऱ्यांमध्ये प्रबोधन करणे गरजेचे आहे.

जिल्हा परिषदेमध्ये गेल्या काही वर्षांपासून एका मागून एक जण लाच घेताना सापडत आहे. अधिकाऱ्यांसह कर्मचारी लाच प्रकरणात अडकत आहे. हा प्रकार जिल्हा परिषदेच्या प्रतिमेस मलिम करणारा आहे. अशा घटना नेहमी होत असल्या तरी प्रशासनाने त्यावर ठोस अशा उपाययोजना केलेल्या नाही.

लाच घेणाऱ्यांबाबत जिल्हा परिषद प्रशासनाकडे तक्रारी झालेल्या असतात. मात्र प्रशासन त्याकडे डोळेझाक करते. लाच प्रकरणात एखादा अटक झाल्यानंतर प्रशासन घाईघाईने त्यावर निलंबनाची कारवाई करते.

'पुढच्याला ठेच मागचा शहाणा' या म्हणीप्रमाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह प्रशासनाने कारभार करणे अपेक्षित आहे. जिल्हा परिषदेसह पंचायत समितीतील एखादा कर्मचारी लाच प्रकरणात अडकला, तर प्रशासनाने तातडीने तसा प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी पाऊले उचलणे गरजेचे आहे. परंतु, तसे काहीच होत नाही. त्यामुळेच असे प्रकार सध्या जिल्हा परिषदेत घडत आहे.

बांधकाम, शिक्षण, आरोग्य, कृषी या विभागात महत्वाचे टेबल मिळण्यासाठी नेहमीच प्रयत्न केले जातात. काहींनी सामाजिक, राजकीय तर अधिकारी यांच्या मदतीने महत्वाचे टेबल आपल्या पदरी पाडून घेतल्याची आहे. याच टेबलवर गोंधळ सध्या होत असून ते टेबल मात्र वरिष्ठ अधिकारी बदलत नसल्याने आगामी काळातही असेच लाच प्रकरणे उघडे होऊन जिल्हा परिषद प्रशासनाची प्रतीमा मलीन होत राहणार आहे.

दोन वर्षांपूर्वी प्रशासकीय बदली झालेली आहे. तो कर्मचारी बदलीच्या ठिकाणी हजर होणे गरजेचे होते. मात्र तो कर्मचारी हजर झालेला नाही. तो मुख्यालयात कार्यरत असून त्याला महत्वाच्या विभागात नियुक्ती देण्यात आली. विशेष म्हणजे त्या कर्मचाऱ्याने बदलीच्या ठिकाणी हजर न होता त्याने आंतरजिल्हा बदली मागिलेली आहे.

प्रमोशन मिळूनही संबंधित विभागात एकजण त्या विभागात हजर झालेला नाही. विशेष म्हणजे तो कर्मचारी त्याच्या विभागाचे तीन खाते प्रमुख बदलून गेलेले असले तरी त्याने त्या विभागातील आपली वतनदारी अद्याप कायम ठेवलेली आहे. प्रशासकीय बदली होऊनही पुन्हा तीच जागा मिळविलेली आहे. आता प्रमोशन होवूनही वतनदारी असलेल्या ठिकाणीच कार्यरत आहे. काहींच्या मुख्यालयातून तालुक्याला बदल्या झालेल्या आहेत. मात्र अद्याप ते तेथे गेलेले नाहीत. ते मुख्यालयातच कामे करीत आहेत. यामध्ये कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहायक, कक्ष अधिकारी यांचाही समावेश आहे. काहींनी स्थानातरणातून आपली सुटका करून घेतलेली आहे. त्यांची नावे स्थानानंतरण प्रक्रियेत आलेली नाही. हे नेमके कशामुळे झाले, याचा शोधही अद्याप लागलेला नाही.

हा सर्व प्रकार नेमका कशासाठी व कशामुळे होतो, याचा आता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे. या सर्व बाबींची काटेकोर अंमलबजावणी झालीच तर पुन्हा लाच प्रकरण घडणार नाही. यासाठी आता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना ठाम भूमिका घ्यावी लागणार आहे. त्यांच्या भूमिकेमुळेच जिल्हा परिषदेतून लाचखोरी हद्दपार होणार आहे.



#### प्रशासनाने स्थानांतरणाची प्रक्रिया राबवली

स्थानानंतरणाची प्रक्रिया झालेली आहे. ही प्रक्रिया एका नेत्याच्या तक्रारीवरून स्थानांतरणाची प्रक्रिया प्रशासनाने राबवली. मात्र ही प्रक्रिया ज्या कर्मचाऱ्यासाठी राबविण्यात आली. त्याला अनेक दिवस त्याच जागेवर ठेवण्यात आलेले आहे. परंतु त्याच विभागातील इतर दोघांचेही स्थानांतरण झालेले आहे. परंतु तेही अद्याप तेथेच काम करीत आहेत. त्यांच्यावर कोणाची मेहरबानी आहे. ते तेथे का कार्यरत आहेत. याचा प्रशासनाने शोध घेणे गरजेचे आहे.

#### 'त्या' कर्मचाऱ्यांच्या उलटसुलट चर्चा

सध्या जिल्हा परिषदेतील शिक्षण, बांधकाम, आरोग्य, जलजीवन, ग्रामपंचायत, कृषी या विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या वर्तुळात चर्चा आहे. ही चर्चा काहींनी संबंधित विभागाच्या खाते प्रमुखांच्या कानावरही हा प्रकार घातलेला आहे. संबंधित खाते प्रमुखांनी संबंधितांचे टेबल बदलणे गरजेचे होते. परंतु, तसे झालेले नाही. त्यामुळे खाते प्रमुखांच्याच कार्यपध्दतीवर आता इतर कर्मचारीच शंका उपस्थित करीत आहेत.

# थोरात क्रीडा संकुलात योगा शिबिर

## मा. आ. तांबे, डॉ. जयश्री थोरातांचा सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** सध्याच्या धावपळीच्या जीवनामध्ये प्रत्येकाला स्वत:चे आरोग्य सांभाळणे अत्यंत गरजेचे असून योगामुळे शरीर लवचिक होते त्यामुळे प्रत्येकाने नियमित योगासने करा असे आवाहन मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांनी केले असून योगा हा भारताची जगाला देण असल्याचे कॅन्सर तज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्हटले असून योग दिनामध्ये आज ४००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे सह्याद्री विद्यालय व ज्युनिअर कॉलेज एकविरा फाउंडेशन आणि जयहिंद लोक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा झाला. यावेळी मा.आ. डॉ. सुधीर तांबे, कॅन्सरतज्ज्ञ डॉ. जयश्री थोरात, कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, सह्याद्री संस्थेचे रजिस्टार उमेश डोंगरे, शिक्षण विस्तार अधिकारी नंदा वलवे, सह सेक्रेटरी आचार्य बाबुराव गवांदे, ॲड. सुहास आहेर, प्राचार्य के. जी. खेमनर, योगशिक्षक किशोर देशमुख, जालिंदर नाईक, भारत शिंदे, उपप्राचार्य प्रा. संजय सुरसे, पर्यवेक्षक ज्ञानदेव पवार, संगीता रणशूर आदींसह सर्व शिक्षक व युवक कार्यकर्ते उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सह्याद्री विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या ३५०० विद्यार्थी व एकवीरा आणि जय हिंद लोक चळवळी ५०० युवकांनी एकत्रित योगाचे विविध प्रकार करत योग दिन साजरा केला. मा. आ. डॉ. पान ४



#### रोजच्या दिनचर्येत योगाचा समावेश करा : थोरात

योगामुळे शरीराला ऊर्जा मिळते. मन शांत होते. आणि संपूर्ण आरोग्य सदृढ राहते. नियमित योगाभ्यासामुळे स्नायूंची ताकद वाढते आणि मानसिक तणाव दूर होतो. त्यामुळे प्रत्येकाने रोजच्या दिनचर्येमध्ये योगाचा समावेश करावा अशा शुभेच्छा माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने दिल्या.

### विजेच्या धक्क्याने २१ वर्षीय तरुणीचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील डागपिंपळगाव येथे शुक्रवारी एक हृदयद्रावक घटना घडली. विजेचा धक्का लागून एका २१ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला. ईशा सचिन पवार (वय २१) असे मृत तरुणीचे नाव आहे. प्राथमिक माहितीनुसार, ईशा पवार या शुक्रवारी दुपारी आपल्या राहत्या घरी काही काम करत असताना त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला. ही घटना घडल्यानंतर घरच्यांनी आणि शेजाऱ्यांनी तातडीने त्यांना वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दुपारी सुमारे १२ वाजता दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच वीरगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शंकर वाघमोडे व भालेराव यांनी तातडीने रुग्णालयात धाव घेतली. यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालाच्या आधारे वीरगाव पोलीस ठाण्यात घटनेची अधिकृत नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, या दुर्घटनेचा अधिक तपास वीरगाव पोलीस करत असून नेमकी परिस्थिती काय होती याचा शोध घेतला जात आहे.

# योग साधना जीवनाचा भाग बनावा

## योग दिनानिमित्त पालकमंत्री विखे पाटील यांचा संदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** भारताच्या संस्कृतीचा आणि परंपरेचा संदेश देणारी योग साधना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून जगात पोहचली आहे. मन स्वास्थ्य आणि आनंदी जीवनासाठी आवश्यक असलेली योग साधना प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनावी, असा संदेश जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण जगात अकरावा जागतिक योग दिन संपन्न झाला. शिर्डी मतदारसंघात भारतीय जनता पक्षाच्या वतीने प्रत्येक मंडलात योगा दिनाचे कार्यक्रम संपन्न झाले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि उच्च माध्यमिक महाविद्यालया मध्ये एकाचवेळी जवळपास ४० हजारांहून अधिक विद्यार्थी,शिक्षक आणि पालक आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि गावातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपला सहभाग नोंदवून योगसाधना केली. याशिवाय प्रवरा उद्योग समूहातील सर्व संस्थांमध्ये योगा दिनानिमित्त योगा विषयी जनजागृती आणि मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न झाले.

संस्थेचे अध्यक्ष तथा पालकमंत्री विखे पाटील यांनी योग साधनेचा संदेश देताना सांगितले की, हजारो वर्षाची परंपरा भारताला या योग साधनेतून मिळाली. आनंदी जीवनाबरोबरच मन:शांती आणि उतम आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या योग साधनेन संपूर्ण विश्वाला आकर्षित केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाचे महत्व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचवल्यानेच आंतरराष्ट्रीय योगा दिन संपूर्ण जगात साजरा होवू लागला, हे भारतीय संस्कृती आणि परंपरेचे यश असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. प्रवरा पान ४



प्रवरेच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने खेळाला प्राधान्य देण्यात आले आहे. यामध्ये योग साधना विषय सुध्दा तितकाच महत्वपूर्ण केला आहे. महाविद्यालयामध्ये योगसाधनेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळावे, यासाठी शाळा-महाविद्यालयामधील क्रीडा शिक्षकांना खास कैवल्यधाम लोणावळा येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येत आहे.

**- डॉ. सुस्मिता विखे पाटील**

# ...चक्क खासगी वाहनाने विद्यार्थी शाळेत

## तुकडी टिकविण्यासाठी शाळांची धडपड : नियमांना दिली तिलांजली

**महेश रक्ताटे**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यामुळे शाळांच्या तुकड्या कमी होवू लागल्या असून शिक्षक अतिरिक्त ठरू लागलेल आहे. त्यामुळे तुकडी वाचविण्यासाठी काही शाळांनी बाहेरील गावातून विद्यार्थी शाळेत आणून तुकडी टिकविण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. याच नियमांना तिलांजली देण्यात आलेली आहे. नियमबाह्य पध्दतीने मुलांना खासगी वाहनातून विद्यार्थ्यांना शाळेत आणले जात आहे. याकडे शिक्षण विभागाचे मात्र दुर्लक्ष झालेले आहे.

जिल्हा परिषदेसह अनुदानित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा पट दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. खासगी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा पटाचा आलेख उंचावत आहे. जिल्हा परिषदेसह अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये गुणवत्ता ढासळलेली आहे, म्हणून पट कमी झालेला नाही. यातील काही शाळांचा पट व्यवस्थित आहे. परंतु, तेथे सुविधा पुरेशा नसल्याचा परिणाम आहे.

तसेच काही शाळांमध्ये सुविधा आहे, मात्र शिकविले जात नसल्याने विद्यार्थ्यांचा पट कमी झालेला आहे. परिणामी शाळेतील विद्यार्थ्यांचा पट कमी झालेला आहे. जिल्ह्यातील अनेक शाळांमधील तुकड्या कमी होण्याची भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे शिक्षकांची संख्या कमी झालेली आहे. शिक्षक कमी झाल्यानंतर इतर शिक्षकांवर काम ाचा ताण वाढणार आहे. हा सर्व प्रकार टाळण्यासाठी आता काही शाळांतील मुख्याध्यापकांसह शिक्षकांनी बाहेरील गावातून विद्यार्थ्यांना आपल्या शाळेत प्रवेश दिलेले आहे. हे प्रवेश देताना विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून शाळेत आणण्याची व घरी सोडण्याची जबाबदारी शिक्षकांनी घेतलेली आहे. त्यासाठी या शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी वाहनाची व्यवस्था केलेली आहे.

काहींनी स्कूलबस, जीप तर काहींनी पीक सारखी वाहने खरेदी केलेली आहे. त्यातून धोकादायक पध्दतीने विद्यार्थ्यांना बसवून शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आणले जात आहे. यामध्ये विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका असतानाही विद्यार्थी शाळांमध्ये आणले जात आहे.

विशेष म्हणजे विद्यार्थी आणत असलेल्या वाहनांवर प्रशिक्षित वाहन चालक नसल्याची चर्चा सध्या जिल्ह्यात सुरु आहे. यामुळे पालकांमधून शाळांसह शिक्षण विभागाच्या कार्यपध्दतीवर नाराजी व्यक्त केली जात आहे. या प्रश्नी शिक्षण विभागाने लक्ष घालावे, अशी मागणी पालकांमधून होत आहे....... (क्रमशः)




शिक्षण विभागातील गोंधळ (भाग-२)

#### 'त्या' शाळांवर त्वरीत कारवाई करा

खासगी वाहनातून नियमबाह्य पध्दतीने विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याचे प्रमाण वाढलेले आहे. वाहतूक नियमांना अनेक शाळांनी तिलांजली दिलेली आहे. अशा शाळा व त्या वाहनांवर प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई करावी, अशी मागणी पालकांमधून होत आहे.

#### अधिकाऱ्यांच्या भेटी फक्त जेवनावळीसाठी

जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील अधिकारी शाळांना भेटी देत आहे. परंतु, या भेटी जेवणावळी पुरत्याच राहत आहेत. शाळांमधली शिक्षण पध्दतीवर कामकाज व गुणवत्ता तपासणी केली जात नसल्याची चर्चा शिक्षण विभागात सुरु आहे. अधिकारी येतात अन् जेवनावळी करून जातात, असेच आता शिक्षकांसह शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य बोलत आहेत.

#### ती आमच्याकडे माहितीच नाही

माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खासगी वाहनाने आणले जाते. याबाबतची कोणती माहिती माध्यमिक शिक्षण विभागाला नाही. याबाबत माध्यमिक विभागाशी संपर्क साधला असता आमच्याकडे फक्त शाळा व विद्यार्थी संख्येची नोंद असते. तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची पगारासंदर्भात माहिती असते. इतर माहिती आम्हाला नाही, असे माध्यमिक शिक्षण विभागातून नाव न छापण्याच्या अटीवर सांगण्यात आले.

**वाचा उद्याच्या अंकात : माध्यमिक विभागातही बोगस दिव्यांग प्रमाणपत्र**

# निरोगी जीवन जगण्यासाठी व्यायाम करणे उत्तम : मुरकुटे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** निरोगी जीवन जगण्यासाठी शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरुस्त राहणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात प्रत्येकाने खेळ व व्यायामाला वेळ दिला पाहिजे, असे प्रतिपादन अशोक कारखान्याचे चेअरमन माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ च्या राष्ट्रीय महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने अशोक उद्योग समूह व अशोक शैक्षणीक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिन अशोक सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला. योगा शिक्षक संदिप कासार यांनी उपस्थितांना योगाचे प्रशिक्षण दिले.




निरोगी जीवनासाठी नियमित व्यायाम व संतुलित आहार आवश्यक आहे. आपल्या शारीरिक आरोग्यासाठी संतुलित व पौष्टिक आहार घ्यावा. नियमित व्यायामाने शारीरिक आरोग्याबरोबर मानसिक स्वास्थ्य लाभते. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. लोकांच्या एकूण आरोग्याबद्दल आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी जागतिक योग दिन साजरा केला जातो.

**– भानुदास मुरकुटे, माजी आमदार**

याप्रसंगी अशोक कारखान्याचे व्हा. चेअरमन हिम्मतराव धुमाळ, अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी मंजुश्री मुरकुटे, संचालक निरज मुरकुटे, प्राचार्या डॉ. सुनीता गायकवाड, संतोष देवकर, भाऊसाहेब दोंड, लव शिंदे, विक्रांत भागवत, कृष्णकांत सोनटक्के, विजयकुमार धुमाळ, ज्ञानेश्वर सांगळे, विजय अंबिलवादे, सुनील बारसे आदी उपस्थित होते.

# खा. लंकेंची रामशेज किल्ल्यावर स्वच्छता मोहिम

## आ. जयंत पाटील, खा. भास्कर भगरे, खा. राजाभाऊ वाजेंची राहणार हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर :** खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या गड किल्ले संवर्धन व स्वच्छता मोहिमे अंतर्गत आज, दि. २२ जुन रोजी नाशिक जिल्ह्यातील रामशेज किल्ल्यावर स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. मार्चमध्ये सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेतील रामशेज हा चौथा किल्ला आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील,खासदार भास्कर भगरे,खासदार राजाभाऊ वाजे हे देखील खा. लंके यांच्यासमवेत स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत.



खा. लंके यांनी छत्रपती शिवरायांचा इतिहास जतन करण्याच्या हेतूने आपल्या वाढदिवसानिमित्त १० मार्च रोजी प्रत्येक महिन्याच्या एका रविवारी गड किल्ले संवर्धन मोहिम राबविण्याची घोषणा केली होती. या घोषणेनुसार मार्च महिन्यात किल्ले शिवनेरीपासून स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. एप्रिलमध्ये श्रीगोंदे तालुक्यातील धर्मवीरगड तर मे महिन्यात भोर जिल्हा पुणे येथील रायरेश्वर गडावर येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली होती. खा. लंके यांच्यासमवेत त्यांच्या मावळा संघटना तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानचे शेकडो कार्यकर्ते या मोहिमेत सहभागी होतात. खा. लंके यांच्या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त स्थानिक शिवप्रेमीही या मोहिमेत सहभागी होत आहेत. स्थानिक शिवप्रेमींचा सहभाग प्रत्येक किल्ल्याच्या मोहिमेमध्ये वाढताना दिसत आहे.

### सपाट आणि मोकळ्या मैदानावर किल्ला

शौर्य आणि पराक्रमाचे प्रतिक असलेल्या रामशेज किल्ला हा सपाट आणि मोकळ्या मैदानावर आहे. समुद्र सपाटीपासून ३ हजार २०० फुट उंचीवर हा किल्ला आहे.

---

### प्रभू रामचंद्रांचे वास्तव्य

किल्ल्याच्या किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर पोहचताच प्रभू श्रीरामांचे दर्शन होते. या मंदिरात राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या तीन मूर्ती आहेत. या ठिकाणी प्रभू रामचंद्रांनी वनवास काळात बंधू लक्ष्मणासोबत विश्रांती घेतल्याची अख्यायिका आहे. त्यावरूनच या किल्ल्याला रामशेज हे नाव पडल्याची इतिहासात नोंद आहे.

---

### शेकडो मावळ्यांची नोंदणी

आज पार पडणाऱ्या या मोहिमेत सहभागी होण्यासाठी शेकडो मावळ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली असून ही नोंदणी अद्यापही सुरु आहे. नोंदणीकृत मावळयांसाठी नास्ता, दुपारचे व रात्रीच्या जेवणाची तसेच राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

# अपघातांना आळा घालण्यासाठी स्पीड ब्रेकर टाका

## सुमित लोंढे यांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे मागणी



पूर्वी या ठिकाणी स्पीड ब्रेकर होते. परंतु रस्त्याचे नूतनीकरण झाल्यानंतर ते काढण्यात आले आहेत. त्यानंतर या ठिकाणी अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे रस्त्याने पायी चालणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरावा लागत आहे.

**– सुमित लोंढे, युवा नेते**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर – पुणे राज्य महामार्गावरील केडगाव येथील अंबिकानगर बस स्टॉपजवळील परिसरात स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी केडगाव येथील युवा नेते सुमित लोंढे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या भागात शाळा, बँक, रुग्णालय, तसेच भाजी मार्केट असल्यामुळे दिवसभर नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असते. यामुळे शाळकरी मुले, महिला, वृद्ध नागरिक यांचे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या निवेदनप्रसंगी अजित कोतकर, सोमनाथ गुंड, महेश पठारे, तुकाराम कोतकर, गणेश लोंढे, अजित ठुबे, शुभम लोंढे, निलेश लाळगे, माधव झेंडे, गणेश शिंदे, राहुल शिंदे, अमोल कोतकर, दत्तात्रय कोतकर, देवा कोबरने, शुभम शिंदे आदी उपस्थित होते.

# नागरदेवळे परिसरात नालेसफाईला प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पावसाळा सुरू होऊनही नागरदेवळे भागात नालेसफाई न झाल्याने निर्माण झालेल्या धोक्याच्या पोर्शभूीवर. भिंगार शहर काँग्रेसचे अध्यक्ष सागर चाबुकस्वार यांच्या पाठपुराव्यानंतर खा. निलेश लंके यांच्या आदेशानुसार येथील ग्राम पंचायतीमार्फत नालेसफाईचे काम सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती चाबुकस्वार यांनी नुकतीच दिली आहे. ग्रामपंचायतीनेही त्वरित हालचाल करत नालेसफाईचे काम हाती घेतले असून सध्या हे काम सुरू आहे.

# पंढरीची वारी जीवनातील दु:ख निवारी

## महंत रामगिरी महाराज; सरला बेटाचे गंगागिरी महाराज दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** सत्कर्मांनीच कर्म शुद्ध होऊन दु:ख दूर होऊ शकतं. देव दयाळू नाही, तर न्यायी आहे हे विश्वातलं कठोर सत्य आहे. भक्तीयोग आणि कर्मयोग वेगळा नाही तर ते दोन्ही एकमेकांना परस्परपूरक आहेत. भक्तीद्वारे कर्म करण्याचे ज्ञान मिळते. गंगागिरी महाराज निष्काम वारी करत निष्काम भावनेने कर्म करीत राहिल्यास देवाला त्याचे फळ द्यावेच लागते. वारी केल्याने भक्ताच्या जीवनातील दु:खाचे निवारण होत असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.

श्री. क्षेत्र सराला बेट ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यास आज बेटात महंत रामगिरी महाराज यांच्या हस्ते सद्गुरु गंगागिरी महाराज ब्रह्मलीन नारायण गिरीजी महाराज यांच्या पाद्यपूजन करून मंदिर प्रदक्षिणा करत प्रारंभ करण्यात आला.

महाराष्ट्रातील गंगागिरी महाराज फडावरील शिस्तप्रिय म्हणून ओळख असणाऱ्या दिंडीत सुमारे २५००,ते ३००० हजार वारकरी सहभागी झाले आहे. यावेळी उपस्थित वारकरी भाविकांना संबोधित करताना महाराज म्हणाले की, वारी भाविकांच्या जीवनातील दु:ख दुर करते. सद्गुरु गंगागिरी महाराज वारीला जातानी स्वत:च्या कुटियाला आग लावून निष्काम भावनेने वारी करत काळानुरुप आपण २०० वर्षांपूर्वी सद्गुरु योगीराज गंगागिरीजी महाराज यांनी सुरू केलेली दिंडी परंपरा आजतागायत सुरू ठेवली आहे.

आपल्या दिंडीत सहभागी होणारा भाविक श्रध्दाळु हा गोरगरीब शेतकरी असून यावर्षी भरपूर पाऊस पडून शेतकरी सुखी व्हावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. यावेळी संकल्प ते सिध्दी तक, ऐक पेड मा के नाम या वृक्षारोपण संवर्धन कार्यक्रमा अंतर्गत श्री क्षेत्र सरल बेट ते लाडगाव या ७ किमी रस्ताच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावण्याचा शुंभारभ करण्यात आला.



### मान्यवरांच्या उपस्थितीत दिंडीचे प्रस्थान

संभाजीनगर भाजपाचे जिल्हा अध्यक्ष संजय खांबायते, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, डॉ. दिनेश परदेशी, प्रभाकर शिंदे, माजी सभापती अविनाश गंलाडे, माजी सभापती संतोष जाधव, बाबासाहेब चिडे, बबनराव मुठे, विजय पवार, नारायण कवडे, पंकज ठोंबरे, दत्तु खपके, हरिशरण गिरी महाराज यासह हजारो भाविकांची उपस्थित दिंडीचे प्रस्थान झाले.

# 'राष्ट्रवादी'च्या आरती उफाडे यांचा मनसेत प्रवेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सावेडी येथील सामाजिक कार्यकर्त्या व राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्यायविभाग शहर सचिव आरती उफाडे यांनी राज ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी आयोजलेल्या कार्यक्रमात महिला जिल्हाध्यक्ष अनिता दिघे यांनी त्यांचा पक्षाचा पंचा घालून स्वागत केले.



यावेळी शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, महिला जिल्हाध्यक्ष अनिता दिघे, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, प्रकाश गायकवाड, संकेत व्यवहारे, संदीप चौधरी, किरण रोकडे, अनिकेत शियाळ, प्रशांत जाधव, प्रवीण गायकवाड आदी उपस्थित होते.

मराठी व हिंदुत्वाच्या विचारांवर मी राज ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये जाहीर प्रवेश केलाआहे त्याचा विचारांवर मी राहणार आहे व पक्ष वाढीसाठी काम करणार आहे.

**– आरती उफाडे**

---

आरती उफाडे यांचे महिलाचे संघटन खुप मोठे आहे. त्याचे मी पक्षात स्वागत करत आहे. त्यांचा पक्षाला व येणाऱ्या मनपा निवडणुकीत नक्कीच फायदा होणार आहे.

**– अनिता दिघे**

# वारकऱ्यांसाठी शिवा ट्रस्टकडून मोफत औषधे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील शिवा ट्रस्ट संचलित शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉक्टर्स, शिक्षक, बीएचएमएस चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांची निवृत्तीनाथ महाराज दिंडी पालखीतील वारकर्यांची श्रीरामपूरचे आझाद मैदानावर तपासणी करून मोफत होमिओपॅथीक औषधांचे वाटप केले.

वारकर्यांचे मोफत तपासणी शिबिराचे आयोजन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते. शिबिरात वारकर्यांची तपासणी करीत मोफत औषधे देण्यात आली. महाविद्यालयातील होमिओपॅथीक डॉक्टरांनी जेष्ठ वारकर्यांचे गुडघ्यांची तेल लावून मालीश केली. पायाला जखम झालेल्या वारकर्यांना मलमपट्टी करण्यात आली.



वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रिजवान अहमद यांनी मार्गदर्शन केले. तर डॉ. बापुसाहेब हरिश्चंद्रे यांनी वारकर्यांनी दिंडी प्रवासात आजारी पडणार नाही म्हणून कोणती काळजी घ्यावी, याबद्दल वारकर्यांना माहिती दिली.

शिबिरासाठी शिवा ट्रस्टचे संचालक दिलीपराव पवार, प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार, डॉ. रिजवान अहमद यांचे मार्गदर्शनाखाली वारकर्यांची तपासणी करून मोफत औषधे देणचयासाठी डॉ. बिपीन जेठालिया, डॉ. स्वाती खोबरे, डॉ. दर्शनी साबळे, संगीता पागिरे, अभय पानसंबळ, अनिता आगळे, विद्या दहे, पौर्णिमा कळमकर, विजय पवार, रियाज पटेल, देवेंद्र जावळे, भगिरथ जाधव, आशिष जैस्वाल, रेखा नाईक, प्रतिमा सोनवणे, योगिता गायकवाड, प्रदीप कळमकर आदी डॉक्टरांनी वारकरी रुग्णांना सेवा देत तपासणी करून औषधे दिली.

# वीर सावरकर मैदानातील शौचालयाची दुरावस्था

## आ. राजळेंच्या निधीतून बांधले होते शौचालय; दुर्गंधीमुळे व्यापारी व नागरिक त्रस्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** वीर सावरकर मैदान येथे बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयाची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या ठिकाणच्या अस्वच्छतेमुळे व्यापारी व नागरिक त्रस्त झाले आहेत. शौचालयात नियमित स्वच्छता न केल्यामुळे त्यातील दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट रस्त्यावर येत आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, आठवडे बाजार आणि दररोजचा भाजीबाजार याठिकाणी भरवल्या जात असल्यामुळे हजारो नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

शौचालयाच्या स्वच्छतेचा पूर्ण अभाव आहे. परिणामी परिसरात डास, माशांचा उपद्रव वाढला आहे. या अस्वच्छतेमुळे आरोग्यावर धोकाही निर्माण झाला आहे.

### व्यापारीवर्ग तीव्र आंदोलनाच्या पावित्र्यात

स्वच्छता न झाल्यास व्यापारी वर्ग तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही त्यांनी दिला. नागरिकांच्या सुविधेसाठी लाखोंच्या निधीतून आ. मोनिका राजळे यांनी हे शौचालय बांधून दिले. मात्र नगरपरिषदेने त्याची देखभाल न केल्यामुळे सद्यस्थितीला शौचालय व परिसर दूषित झाला असून नागरिक त्या बाजूने जाणेही टाळत आहेत.

या संदर्भात बाजारकरी व्यापारी मित्र मंडळाचे संदीप काकडे यांनी नगरपरिषद प्रशासनावर निष्काळजीपणाचा आरोप केला असून, वारंवार तक्रार करूनही नगरपरिषद याकडे दुर्लक्ष करत आहे.



# घुले पतसंस्थेकडून ज्ञानेश्वरी पालखीचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा येथील मारूतरावजी घुले पाटील पतसंस्थेकडून नेवाशातील ज्ञानेश्वरी पालखीचे उत्स्फुर्तपणे स्वागत करण्यात आले.

ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी असलेल्या नेवासा येथून ग्रंथराज ज्ञानेश्वरी आषाढी पालखी दिंडीने टाळ मृदुंगाच्या गजरात व 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा गजर करत पंढरपूरकडे प्रस्थान केले. यावेळी माऊलींच्या निघालेल्या पालखी रथाचे स्वागत लोकनेते मारुतरावजी घुले पाटील पतसंस्थेकडून करण्यात आले.



स्वागत कमान व फटाके फोडून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी पालखी सोहळा प्रमुख वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांचा सन्मान केला.

यावेळी व्यवस्थापक लक्ष्मण नाबदे, विशाल जायगुडे, अंकूश धनक, प्रविण कोरेकर, कृष्णा आरले, अजय पारखे यासह आदी कर्मचारी उपस्थित होते.

# तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग

## प्रा. सुनिता वाघ; डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारतातील प्राचीन संस्कृतीत योग, योगासने, योग साधना, यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन काळापासून साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्त्व, त्याचे फायदे आणि गरज का आहे हे सांगितले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग आहे. योगामुळे मनावरही चांगले संस्कार होतात.



तेव्हा योगाला महत्त्व द्या, असे आवाहन योगशिक्षिका प्रा. सुनिता वाघ यांनी केले आहे.

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग शिक्षिका प्रा. सुनिता वाघ यांनी योग कसा करावा याचे प्रात्यक्षिकासह माहिती दिली.

योग दीन महाविद्यालयातील ग्रीन क्लब, एनएसएस, विद्यार्थी विकास मंडळ तसेच शिक्षक समन्वयक प्रा. गणेश डहाणे, प्रा. सुनील मांढरे, प्रा. मंदार बिडवे, डॉ. एस. के. शेख, प्रा. पी. बी. औताडे, प्रा. वी. पी. पाटेकर, प्रा. डी. बी. ठानगे, प्रा. नाना मुळीक, प्रा. एन. ए. पोंधे , प्रा. एम. एच. नेरकर, आर. बी. शेलार यांनी कार्यक्रम आयोजित केला.

यावेळी प्राचार्य डॉ. रविन्द्र नवथर, सर्व विभाग प्रमुख शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील फाऊंडेशन चे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ. पी. एम. गायकवाड, टेक्निकल डायरेक्टर प्रा. सुनील कल्हापुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

योग्य आणि व्यायाम हे आरोग्याचे प्रभावशाली माध्यम आहे. शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन, मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते. योगा हे पाच हजार वर्षे पूर्वीची परंपरा आहे. यामुळे शारीरिक,मानसिक आणि आध्यात्मिक साधना मिळते. या योग दिनाचे महत्त्व शिक्षक, विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावे.

**– प्रा. सुनिता वाघ, योगशिक्षिका**

# कोणतीही अपेक्षा न ठेवता वारकऱ्यांचा वारीत सहभाग

## कृषी मंत्री कोकाटे; संत निळोबाराय यांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पंढरीच्या विठूरायाचे दर्शन घेण्यासाठी २२ दिवस वारीत सहभागी होणारे वारकरी लाखोंच्या संख्येने कोणतीही अपेक्षा न ठेवता सहभागी होतात, असे गौरवोद्गार राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी काढले आहे.

राज्यात मानाच्या १० पालख्या असून त्यात वारकरी संप्रदायातील शेवटचे संत असलेले पारनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र पिंपळनेर येथील श्रीसंत निळोबाराय यांच्या पालखीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे मोठ्या भक्ती भावाने विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, पारनेरचे आ. काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते श्री संत निळोबारायां चा अभिषेक करून मानाच्या पालखीला नारळ फोडून पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान करण्यात आले.

यावेळी जिल्हाभरातून वारकरी मोठ्या संख्येने श्री क्षेत्र पिंपळनेर येथे मोठ्या भक्ती भावाने एकत्रित जमा झाले. प्रारंभी प्रसिद्ध किर्तनकार हभप मोहानंद महाराज पुरंदवाडकर यांचे किर्तन झाले. या कार्यक्रमला विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, आ. काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, डॉ. नारायण महाराज जाधव, मोहनंद महाराज पुरंदवाडकर, मासारे महाराज, डॉ. विकासानंद महाराज मिसाळ, समाधान महाराज शर्मा, विश्वनाथ कोरडे, तहसिलदार गायत्री सौंदाने, प्रशांत गायकवाड व इतर मान्यवर व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वारी सुख, समाधानाचा सोहळा

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणले की, मी या आधीही येथे आलो होतो. त्यावेळच्या आणि आच्या परिस्थिती त खूप बदल पाहायला मिळत आहे. वारकरी संप्रदायात महाराजांच्या माध्यमातून खरा बदल झाला आहे. म्हणून एप्रिल, मे महिन्यात पाऊस झाला. अन्यथा दिंडीला पाण्याचे टँकर द्यावे लागतात. वारी ही अनेक वर्षांची परंपरा, सुख व समाधानाचा सोहळा आहे. सरकार वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ देणार नाही. पुण्य करणाऱ्या या वारकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे. वारकरी संप्रदायाचा त्याग, निष्ठा यामुळे वेळेच्या आधी पाऊस आला. यावेळी मी वेळात वेळ काढून एक दिवस मी प्रथमच या निळोबा राय दिंडी सोहळ्यात पायी चालणार आहे.

श्री निळोबाराय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव सावंत प्रास्ताविक करताना म्हणाले की , संत निळोबाराय दिंडी सोहळ्याची ही १७५ वर्षांची खूप जुनी परंपरा असून जिल्हयातून या सोहळ्या ६२ दिंड्या सहभागी होतात. सहभागी झालेला दिंड्यांना राज्य शासनाच्या वतीने २० हजार रुपये त्यांच्या खात्यावर जमा केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकऱ्यांना पावसाचा त्रास होऊ नये म्हणून एक ट्रक पावसाळी रेनकोट येथे पाठवून दिले.राज्यात १० मानाच्या पालख्या आहेत, त्यात पिंपळनेरच्या या पालखीचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना-वरून बोलताना आ. काशिनाथ दाते म्हणाले की, पिंपळनेरची ही दिंडी खऱ्या अर्थाने अण्णा हजारे यांनी सुरू केली. त्यात ७ वर्षे ते पायी सहभागी झाले. सावंत यांची व सर्व विश्वस्तांची या देवस्थानच्या विकासात सातत्याने धडपड असते. या तिर्थक्षेत्राचे महत्त्व जगभर झाले. या देवस्थान च्या विकासासाठी या शासनाने नुकताच ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.



श्रीरामपूर– श्री क्षेत्र गोदावरी धाम सरला बेट येथून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे निघालेल्या मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांच्या अधिपत्याखाली पायी दिंडी सोहळ्याचे श्रीरामपूर शहरात स्वागत करण्यात आले. यावेळी थत्ते मैदान येथे रिंगण सोहळा पार पडला. (छायाचित्रः सुनील पांढरे)

# गुरुकुल संपदा स्कूलमध्ये नवागतांचे अनोखे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : रंगेबिरंगी फुग्यांची कमान....ढोल पथकांचा निनाद.... गुरुजनानांचा हातात हात.....अन मुलांवरील शुभेच्छाचा वर्षाव करत राहाता तालुक्यातील कोल्हार येथील गुरुकुल संपदा स्कूलच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अनोखे स्वागत केले. नवागतांच्या स्वागतासाठी शिक्षकांनी स्वखर्चातून विद्यार्थ्यांना चॉकलेट व गुलाब पुष्प भेट देत अनोखा प्रवेशोत्सवाचा उपक्रम राबविला.

दरम्यान आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न बाळगून शाळेच्या दिशेने सरसावलेल्या विद्यार्थ्यांना गुरुकुल संपदा स्कूलकडून जंगी स्वागत करण्यात आले. ढोल पथकाच्या आवाजात रंगेबिरंगी फुग्यांच्या कमानीतून गुरुजनांचा हातात हात देत विद्यार्थ्यांचा शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे विश्वस्त यांनी पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा केला.

जवळपास चारशे विद्यार्थी असलेले गुरुकुल संपदा स्कूल आजही राहाता तालुक्यात नावलौकिक आहे. विशेष म्हणजे पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी शिक्षक अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत असतात.



यावेळी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी गुरुकुल संपदा स्कूलचे संस्थापक सुधीर आहेर, प्राचार्य सारिका आहेर यांसह शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना चॉकलेट, बिस्किटांसह गुलाबपुष्प देवून सन्मान केला.

यावेळी गुरुकुल संपदा स्कूलचे संस्थापक सुधीर आहेर, प्राचार्य सारिका आहेर यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे विश्वस्त यांसह पालक उपस्थित होते.

# अवैध दारु बाळगणाऱ्यावर कारवाई

## हसनापूर येथील साईसागर हॉटेलवर टाकला छापा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील हसनापूर रोडवरील हॉटेल साईसागरवर पोलिसांनी छापा टाकून या ठिकाणाहून देशी तसेच विदेशी अवैध दारू विकणाऱ्यास अटक केली. पोलिसांनी या ठिकाणाहून १ लाख ६६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी विशेष पथक तयार करुन अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अवैध्य धंद्यांविरुद्ध कारवाई करणेबाबत आदेश दिले होते. त्या अनुषंगाने परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांनी लोणी पोलीस स्टेशन व आश्वी पोलीस स्टेशन हद्दीत विशेष पोलीस पथकासह पेट्रोलींग करुन लोणी येथील हसनापुर रोडवरील हॉटेल साईसागर येथे लोणी पोलीस स्टेशनचा स्टाफ सोबत घेऊन छापा टाकला.

आरोपीला ताब्यात घेऊन त्यास विश्वासात घेवून त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सागर प्रकाश पावसे (रा. सोनार गल्ली, लोणी बु. ता. राहाता) असे असल्याचे सांगितले. त्याकडे मिळून आलेले विविध प्रकारच्या देशी- विदेशी दारुच्या साठ्याबाबत विचारपूस केली असता त्याने तो माल अवैधरित्या विक्री करण्याचे हेतूने जवळ बाळगला असल्याचे सांगितले. त्याचे कब्जात मिळून आलेला एकूण १,४६,४०८/- रु.किंमतीचा देशी विदेशी कंपनीच्या दारु, बियरच्या बाटल्या असा एकूण १,६६,७८८/- रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेवून जप्त केला.

आश्वी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलींग करुन अवैध सादतपुर गावाचे शिवारात लोणी ते संगमनेर रोडवर हॉटेल साई सागर येथे जाऊन छापा टाकला असता आतिष भाऊसाहेब गायकवाड यास देखील ताब्यात घेतले.

लोणी पोलीस स्टेशन हद्दीत व आश्वी पोलीस स्टेशन हद्दीत दोन ठिकाणी अवैध दारु विक्री करणाऱ्यांवर छापे टाकून एकूण २,२२,१७८ रुपये किंमतीच्या मुद्देमालासह २ आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली असूनलोणी व आश्वी पोलीस स्टेशन येथे मुंबई दारू बंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आली आहे.

# गौतम पब्लिक स्कूलमध्ये योगदिन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शालेय परिसर चैतन्याने भरून गेला होता. शाळेचे प्राचार्य नूर शेख यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी आपली जीवनशैली योगमय करून नियमित योग साधना केली पाहिजे. आपले शरीर आणि मन सुंदर घडवायचे असेल, तर प्रत्येकाने दिवसाची सुरवात योग साधनेने करावी, असे आवाहन केले.

मैदानी खेळात वर्चस्व असलेल्या गौतम पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना नियमितपणे मैदानावर विविध खेळाचे गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये नियमित व्यायामाचा सराव व योग साधना देखील विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते. त्याचा सकारात्मक परीणाम विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेवर होतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय योग दिन हा विद्यार्थ्यांना योगाभ्यासाद्वारे शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण होता. उल्लेखनीय बाब म्हणजे, शिक्षकांनी उत्साहाने विद्यार्थ्यांसोबत विविध योगासने करण्यात सहभाग घेतला. त्यामुळे एक सुसंवादी आणि फलदायी वातावरण निर्माण झाले होते. संस्थेचे चेअरमन मा.आ. अशोकराव काळे, विश्वस्त आ. आशुतोष काळे, व्हा.चेअरमन छबुराव आव्हाड, सचिव चैतालीताई काळे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



### १२०० विद्यार्थ्यांचा सहभाग

एकूण १२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संचालक सुधाकर निलक, हॉकी प्रशिक्षक रमेश पटारे, हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र आढाव, क्रिकेट प्रशिक्षक इसाक सय्यद यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# कोल्हार येथील महाविद्यालयात योग दिन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने कोल्हार येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या मैदानावर योगाचे प्रात्यक्षिक व व्याख्यान आयोजित करण्यात आले.

प्रमुख व्याख्याते म्हणून भगवती माता देवालय ट्रस्टचे विश्वस्त व भगवती माता विद्या मंदिर स्कूल कमिटीचे अध्यक्ष संभाजी देवकर यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून योगा व प्राणायाम विषयी बहुमोल मार्गदर्शन केले. संभाजीराजे देवकर हे गेली १२ वर्षापासून विविध संस्था तसेच कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भगवती माता विद्या मंदिर, कोल्हार भगवतीपूर येथे सातत्याने योगा विषयी तसेच आरोग्य व समतोल आहाराचे महत्व संदर्भात मार्गदर्शन करत आहेत. सदर प्रसंगी कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भगवती माता विद्या मंदिर व प्रवरा हायस्कूलचे सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



भगवतीपुर सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, माजी सरपंच रावसाहेब खर्डे, गोरक्ष खर्डे, लोळगे, अक्षय मोरे, सूर्यभान कापसे, दिलीप शेळके, विनोद गुगळे, काळूराम बोरुडे, बाबासाहेब बोरुडे, अरुण बोरुडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिभाऊ आहेर, भगवती माता विद्या मंदिरच्या प्राचार्या दीप्ती अडेप, प्रवरा हायस्कूलचे प्राचार्य सुधीर मोरे उपस्थित होते.

# दानपेटी चोरीप्रकरणी तपासास विलंब

## ग्रामस्थांकडून ९ जुलैला आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : धामणगाव (ता. पाथर्डी) : येथील प्रसिद्ध जागृत देवस्थान असलेल्या जगदंबा देवी मंदिरातील दानपेटी चोरीप्रकरणी अजूनही तपास न लागल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे बुधवार, दि. ०९ जुलै रोजी पाथर्डी पोलीस स्टेशनसमोर तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे, असा इशारा निवेदनाद्वारे ग्रामस्थांनी दिला आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ मे रोजी मंदिरातील दानपेटी चोरीस गेल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांकडून स्थानिक गुन्हे शाखेकडे तपास सोपवण्यात आला होता. दरम्यान, दानपेटी मंदिराजवळील शेतात आढळून आली. मात्र चोरांचा अद्याप तपास लागलेला नाही. या संदर्भात ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, मंदिरात सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही चोरीच्या दिवशी ते बंद होते, हा संशयाचा मुद्दा असून, ही बाब गंभीर आहे. तसेच, मंदिराच्या ट्रस्टतर्फे कुठलाही खुलासा करण्यात आलेला नाही. ट्रस्टचे अध्यक्ष, सचिव यांच्याकडून निष्क्रियता दिसून येत असून, विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याची मागणीही ग्रामस्थांनी केली आहे. गावातीलच शिवाजी कुटे यांनी मंदिरासाठी सीसीटीव्ही कॅमेरे दान केले होते, मात्र वर्षभरापूर्वी कोणतीही पूर्वसूचना न देता ते कॅमेरे काढून टाकण्यात आले, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. चोरीचा प्रकार पाहता दानपेटी उघडण्यासाठी लागणाऱ्या माहितीची चोरांना कल्पना होती, हेही विशेष संशयाचे कारण आहे, असेही ग्रामस्थांनी निदर्शनास आणले आहे.

### निवेदनावर यांच्या सह्या

या निवेदनावर शिवाजी काकडे, कुंडलिक कुटे, भाऊसाहेब मरकड,राजू चव्हाण, नवनाथ काकडे, विठ्ठल कुटे, अंकुश गिरी, आसाराम गिरी, रामदास बर्डे,विजय चव्हाण, अमोल काकडे, रामेश्वर काकडे, सुरेश काळे, सचिन वारे, रमेश कराळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कृषी पंढरी ते श्री विठ्ठल पंढरी वारी

## महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : कृषी पंढरी ते श्री विठ्ठल पंढरी कृषी तंत्रज्ञान प्रबोधन वारी हा प्रबोधन पर उपक्रम विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी सुरू केला आहे. कृषी तंत्रज्ञान विस्ताराचा हा एक नाविन्यपूर्ण उपक्रम आहे. या उपक्रमामुळे कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार होत असल्याचे प्रतिपादन संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील शास्त्रज्ञ तसेच कर्मचारी यांच्या कृषी तंत्रज्ञान प्रबोधन वारी असा आशय असलेली राहुरी ते पंढरपूर या सायकलवारीचे प्रस्थान झाले. या सायकल वारीला शुभेच्छा देताना डॉ. गोरक्ष ससाणे बोलत होते. राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड यांनी या शास्त्रज्ञांच्या कृषी तंत्रज्ञान प्रबोधन वारीला शुभेच्छा दिल्या.

या सायकलवारीत कृषी शक्ती व यंत्रे विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड, विद्यापीठाचे एनसीसी अधिकारी लेफ्टनंट डॉ. सुनील फुलसावंगे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र निमसे,पदुत्तर महाविद्यालयाचे क्रीडा अधिकारी डॉ. बाबासाहेब भिंगारदे, दत्ता कदम, प्रणव पावसे, श्री. रवींद्र हरिचंद्रे व श्रीश नलावडे यांचा या वारीमध्ये समावेश आहे.

### वारी दरम्यान शेतकऱ्यांना मार्गदर्शन

या कृषी तंत्रज्ञान प्रबोधन वारी दरम्यान शास्त्रज्ञांनी कृषी महाविद्यालय, मिरजगाव येथे विद्यार्थ्यांना आणि माहिजळगाव व करमाळा येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कृषी तंत्रज्ञान प्रबोधन वारीला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशी सायकल वारीत सहभागी शास्त्रज्ञांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले.व कर्मचारी यांच्याकडून कौतुक होत आहे.



# अवैध दारू वाहतूक करणारे गजाआड

## ८६ हजारांचा रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : अवैध दारू वाहतूक करणाऱ्या दोघांना पोलिसांनी गजाआड केले आहे. त्यांच्याकडून ८६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक धनंजय अ. जाधव यांना गोपनीय बातमीदारामार्फत गोपनीय खबर मिळाली की, दोन इसम बजाज कंपनीच्या पल्सर मोटर सायकलवर मोठ्या प्रमाणावर देशी-विदेशी बेकायदेशीर दारू घेऊन जात आहेत.या माहितीवरून तातडीने पोलीस हवालदार किरण गायकवाड व पोलीस नाईक भानुदास काळोखे यांना सदरची माहिति देऊन कारवाई करण्याचे आदेश दिले असता त्यांनी तातडीने अहिल्यानगर संभाजीनगर महामार्गावर नेवासा फाटा येथे नाकाबंदी सुरू केली. त्यावेळी गोपनीय बातमीदाराने दिलेल्या बातमीनुसार दोन्ही ईसम एका पल्सर मोटर सायकलवर आले. त्यांना थांबण्याचा ईशारा केला असता पळून जाऊ लागले. त्यांना सिताफिने ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी त्यांच्याकडे पल्सर मोटर सायकलवर मोठ्या प्रमाणावर देशी विदेशी दारू घेऊन जात असल्याचे दिसून आले. दोघांना त्यांच्या नावाबाबत विचारपूस केली असता त्यांनी शुभम संजय यादव व सौरभ संजय साळवे दोन्ही रा. भेंडा ता. नेवासा असे सांगितले. सदरची देशी-विदेशी अवैध दारू दोन पंचांसमक्ष पंचनामा करून जप्त केली.



# संपादकीय

## युद्धज्वराचे परिणाम

इराणवर इस्त्रायलन केलेल्या हल्ल्याचा जगातून निषेध होत असताना भारताने मात्र त्यावर काहीच भूमिका घेतली नाही. इराणचे चाबहार बंदर भारत विकसित करीत आहेत. व्यूहात्मकदृष्ट्या भारताला इस्त्रायलपेक्षा इराण महत्त्वाचा आहे. इराणने रुपयात कच्चे तेल आपल्याला पुरवले. अनेकदा तो उधारीत इंधन पुरवतो. त्याचबरोबर इराण भारताच्या बाजूने भूमिका घेतो. मध्य पूर्वेत जाण्यासाठी इराणच्या चाबहार बंदराचा आणि तिथल्या लोहमार्गाचा भारताला चांगला फायदा होणार आहे. असे असताना इस्त्रायलकडून काही लष्करी सामुग्री आपण आयात करतो, एवढ्या एकाच कारणासाठी भारताने या युद्धाच्या वेळी 'नरो वा कुंजरो' वा भूमिका घेतली. तशीच भूमिका युक्रेनवर रशियाने केलेल्या हल्ल्याच्या वेळी घेतली गेली. भारताची ही भूमिका काही आर्थिक फायदे लक्षात घेऊन घेतली गेली असे म्हणावे, तर तशीही परिस्थिती नाही. भारताला या युद्धात समेट घडवण्याची संधी होती; परंतु ही युद्धाची वेळ नाही, असे सांगण्यावरच आपण समाधान मानले. या वेळी आगळिक इस्त्रायलने केली असून, अमेरिकेच्या पाठिंब्यावर त्याची मध्य पूर्वेत कुरघोडी सुरू आहे. इराणला अण्वस्त्र आणि अणुबाँबपासून परावृत्त करण्याऐवजी इराणमध्ये सत्तांतर करण्यात इस्त्रायलला जास्त रस दिसतो. नेतान्याहू यांनी घोषणा केली आहे, की इस्रायल इराणच्या अणुकार्यक्रमाला कमकुवत करण्यासाठी आणि त्याच्या सैन्याचा नाश करण्यासाठी जितके दिवस लागतील तितके दिवस कदाचित अनेक आठवडे हल्ले करत राहील. इस्रायलने इराणवर ड्रोन आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली आहेत आणि त्यांच्याकडे प्रत्युत्तरासाठी इतर अनेक पर्याय आहेत. त्यामुळे अधिक रक्तपात होऊ शकतो, म्हणून हे युद्ध कोणत्या उपाययोजनांद्वारे संपवता येईल हे पाहणे महत्त्वाचे आहे. इराण इस्रायलवर दहशतवादी हल्ले करत राहतो, क्षेपणास्त्र हल्ले करत राहतो किंवा युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव येईपर्यंत इतर मार्गांचा अवलंब करतो. इस्रायल त्याच्या शत्रूंवर हल्ला करतो, तेव्हा त्याला अनेकदा अमेरिका आणि प्रमुख युरोपीयन मित्रांकडून पाठिंबा मिळतो; परंतु हे देश त्वरित शत्रुत्व संपवण्याची मागणी करतात; मात्र इस्रायल हल्ला सुरू ठेवू इच्छितो. आताही इस्रायल युरोपीयन देशांच्या मतांची पर्वा करण्याची शक्यता कमी आहे.

इस्रायल इराणवर अधूनमधून क्षेपणास्त्र किंवा हवाई हल्ला करू शकतो किंवा इराणमध्ये हत्या आणि तोडफोड करू शकतो. इराण वेळोवेळी इस्रायलवर गोळीबार करेल, तसेच दहशतवाद आणि इतर प्रयत्न करेल. आता इराणने युद्ध सुरू झाल्याचे जाहीर केले आहे. दोन्हीकडून माघारीची शक्यता दिसत नाही. आखातातील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची, पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची आणि शेअर बाजारांमध्ये घसरण होण्याची शक्यता वाढली आहे. तेलाच्या किमतीत वाढ, महागाई आणि शेअर बाजारात अशांतता अशा समस्यांना तोंड द्यावे लागेल. इस्रायलने इराणच्या अणु आणि लष्करी प्रतिष्ठानांवर अलिकडेच केलेले हल्ले आणि इराणने केलेल्या प्रत्युत्तरामुळे मोठ्या युद्धाची भीती निर्माण झाली आहे. जर हा तणाव पूर्ण युद्धात बदलला, तर त्याचा परिणाम केवळ मध्य पूर्वेलाच नाही, तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. मध्य पूर्व हा जगातील तेल उत्पादनाचा एक प्रमुख भाग आहे. जगातील सुमारे २५ टक्के तेल व्यापार इराण आणि होर्मुझच्या आखातासारख्या त्याच्या आसपासच्या भागातून होतो. जर इस्रायल आणि इराणमधील युद्ध आणखी वाढले, तर तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय येऊ शकतो. शिपिंग मार्ग बंद होऊ शकतात आणि तेल टँकरवर हल्ल्याचा धोका वाढू शकतो. यामुळे तेलाच्या किमती गगनाला भिडू शकतात. त्याचा परिणाम अलिकडेच दिसून येऊ लागला आहे. गेल्या काही दिवसांत तेलाच्या किमतीत ७-१३ टक्के वाढ झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमती प्रतिपिंप ७४.६० डॉलर्सवर पोहोचल्या. युद्ध आणखी वाढले तर कच्च्या तेलाच्या किमती आणखी वेगाने वाढू शकतात. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे सामान्य लोकांचा खर्च वाढेल. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईदेखील वाढेल. तेलाचा वापर केवळ वाहनांसाठीच नाही, तर वस्तूंच्या उत्पादनासाठी आणि ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठीदेखील केला जातो. कच्चे तेल महाग झाले, तर वाहतुकीचा खर्च वाढेल. त्यामुळे अन्नपदार्थ आणि दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढू शकतात. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांवर भार वाढेल. दोन्ही देशांमधील युद्धाच्या बातमीने शेअर बाजारातही खळबळ उडाली आहे. याचा भारतीय शेअर बाजारावरही मोठा परिणाम झाला आहे. काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की भीतीपोटी गुंतवणूकदार सोने किंवा अमेरिकन डॉलरसारख्या सुरक्षित ठिकाणी आपले पैसे गुंतवत आहेत. सोन्याची किंमत वाढली आहे. डॉलर मजबूत झाला आहे आणि त्यामुळे शेअर बाजारात घसरण दिसून येत आहे. तथापि, या तणावाचा काही बाजारपेठांवर अद्याप फारसा परिणाम झालेला नाही; परंतु जर युद्ध वाढले तर जागतिक शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण होऊ शकते. भारतातील सेन्सेक्स आणि निफ्टी सारख्या बाजारपेठांवरही परिणाम होऊ शकतो. युद्धाचा जागतिक पुरवठा साखळीवरही परिणाम होऊ शकतो. जागतिक पुरवठा साखळी बंद पडल्याने इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स आणि औषधे यासारख्या उद्योगांचे नुकसान होऊ शकते. यामुळे कारखाने बंद होऊ शकतात आणि बेरोजगारी वाढू शकते. अनेक विमान कंपन्यांनी मध्य पूर्वेतील उड्डाणे स्थगित किंवा रद्द केली आहेत आणि काही देशांनी त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले आहे. मध्य पूर्वेतील सर्वात मोठी विमान कंपनी एमिरेट्सने सांगितले, की त्यांनी इराक, जॉर्डन, लेबनॉन आणि इराणला जाणारी आणि जाणारी उड्डाणे ३० जूनपर्यंत स्थगित केली आहेत. एतिहाद एअरवेजने अबू धाबी आणि तेल अवीव दरम्यानची उड्डाणे रद्द केली आहेत. कतार एअरवेजने इराण, इराक आणि सीरियाला जाणारी उड्डाणे तात्पुरती रद्द केली आहेत.

# मैत्री कोमात, वस्त्रहरण जोमात!

**विश्वभ्रमण**

**– प्रा. जयसिंग यादव**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयात जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलन मस्क यांचा मोठा वाटा आहे. दोघे जीवलग मित्र; परंतु ट्रम्प यांच्या जशास तसे कर आणि अन्य आर्थिक धोरणांमुळे दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला. दोघे एकमेकांचा पाणउतारा करत आहेत. दुरावा आता एवढा वाढला आहे की ते परस्परांचे आर्थिक नुकसान करायला लागले असून एकमेकांचे वस्त्रहरणही करत आहेत.

जगातील आर्थिकदृष्ट्या सर्वात शक्तिशाली देशाचे अध्यक्ष आणि जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती यांच्यादरम्यान गेल्या दोन दिवसांमध्ये घडलेल्या घटनांनी संपूर्ण जगाला धक्का दिला आहे. माध्यमांनी या दोन्ही व्यक्तिमत्त्वांमधील शब्दयुद्धाच्या प्रत्येक पैलूवर चर्चा केली आहेच; परंतु त्यांच्या परिणामांचे विश्लेषणदेखील केले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि टेस्ला, स्पेसएक्स आणि एक्स सारख्या उपक्रमांचे मालक एलन मस्क यांनी एकमेकांवर अनेक धक्कादायक आरोप केले आहेत. त्यात काही वैयक्तिक हल्लेदेखील आहेत. आरोप किती खालच्या पातळीवर गेले आहेत, हे सांगण्यासाठी काही उदाहरणे दिली, तर ते वावगे ठरणार नाही. मस्क यांनी ट्रम्प यांच्यावर गुन्हेगारी वृत्तीच्या जेफ्री एपस्टाईनबरोबर आक्षेपार्ह संबंध असल्याचा आरोप केला आहे. त्याला उत्तर म्हणून अमेरिकन सरकारने मस्क यांच्या कंपन्यांना दिलेले करार रद्द करून जनतेचे अब्जावधी डॉलर्स वाचवता येतील, असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. या दोन विधानांमुळे अमेरिकेत अशांततेचे वातावरण निर्माण झाले. ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर मस्क यांच्या 'टेस्ला'ला १५२ अब्ज डॉलर्स (सुमारे १३ लाख कोटी रुपये) नुकसान सहन करावे लागले आहे, तर मस्क यांच्या आरोपांमुळे विरोधी पक्षांनी पुन्हा एकदा ट्रम्प यांच्याविरुद्ध महाभियोगासाठी आवाज उठवला आहे. या दोन्ही विधानांनंतर ट्रम्प आणि मस्क एकमेकांचे किती नुकसान करू शकतात, या संघर्षाचा मस्कच्या कंपन्यांवर आणि वैयक्तिक जीवनावर काय परिणाम होऊ शकतो, मस्क यांच्याशी होणाऱ्या या संघर्षाचा ट्रम्प यांच्या राजकीय जीवनावर कसा परिणाम होऊ शकतो हे प्रश्न विशेष चर्चेत आहेत.

ताज्या वादांनंतर ट्रम्प म्हणाले की ते आणि मस्क आता पूर्वीसारखे मित्र राहणार नाहीत. एवढेच नाही तर, मस्क यांच्या आक्रमक भूमिकेनंतर ट्रम्प यांनी या उद्योगपतीला दिलेले सरकारी करार आणि अनुदान रद्द करून खूप बचत केली जाऊ शकते, असे म्हटले. बायडेन यांनी तसे न केल्याबद्दल आपल्याला आश्चर्य वाटते, असेही ते म्हणाले. न्यूयॉर्क टाईम्सच्या एका अहवालात म्हटले आहे की मस्क यांची कंपनी टेस्ला आणि त्यांची अंतराळयान आणि रॉकेट उत्पादक कंपनी स्पेसएक्स यांना गेल्या एका वर्षात १७ संघीय विभाग आणि एजन्सींकडून शंभरहून अधिक करार मिळाले आहेत. त्यांची किंमत तीन अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. असा अंदाज आहे की मस्क यांनी आतापर्यंत अमेरिकन सरकारकडून ३८ अब्ज डॉलर्सची कामे मिळवली आहेत. त्यापैकी बहुतेक स्पेसएक्सला देण्यात आली आहेत. याशिवाय, हरित ऊर्जा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी 'टेस्ला'ला सरकारकडून अनेक प्रकारची अनुदाने मिळतात. त्यात इलेक्ट्रिक कार खरेदीदारांना कर सवलतीची तरतूददेखील आहे. त्याचा सर्वाधिक फायदा 'टेस्ला'ला होतो. तथापि, ट्रम्प या अनुदानांना कात्री लावण्याची शक्यता आहे. त्यामुळे मस्क यांच्या कंपनीचा वार्षिक नफा १.२ अब्ज डॉलर्सने कमी होऊ शकतो.



'द न्यूयॉर्क टाईम्स' आणि 'द वॉल स्ट्रीट जर्नल' या अमेरिकन मीडिया ग्रुप्सने मस्क यांच्यावर ड्रग्ज वापराचा आरोप केला आहे. दरम्यान, नासाच्या धोरणावरही प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. त्यात म्हटले आहे की, त्यांच्याशी करार करणाऱ्या कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी आणि कंत्राटदारांनी ड्रग्जमुक्त वातावरण सुनिश्चित केले पाहिजे. मस्क यांना नियम मोडूनही सरकारी कंत्राटे मिळाली आहेत. इतकेच नाही तर, द टाईम्सने आपल्या अहवालात मस्क यांना ड्रग्जशी संबंधित चाचण्या घेण्याचा इशारादेखील दिला आहे. तथापि, मस्क यांनी हे आरोप नाकारले आहेत. २०२४ मध्ये त्यांनी स्पष्ट केले की डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर ते केटामाइन हे औषध घेतात. ट्रम्प यांचे जवळचे सहकारी स्टीव्ह बॅनन अतिउजव्या नेत्यांमध्ये गणले जातात. त्यांनी ट्रम्प आणि मस्क यांच्यातील शब्दयुद्धादरम्यान म्हटले होते की सरकारने मस्क यांच्या इमिग्रेशन स्टेटसची चौकशी करावी. बॅनन म्हणाले होते, की मस्क अमेरिकेत बेकायदेशीरपणे राहत आहे आणि त्यांना ताबडतोब त्यांच्या देशात पाठवले पाहिजे. मस्क यांचा जन्म दक्षिण आफ्रिकेत झाला होता. ते अमेरिकन नागरिक आहेत. अध्यक्षीय निवडणुकीदरम्यान मस्क आणि ट्रम्प यांच्यात अतिशय जवळीक होती. ट्रम्प यांना निवडून आणण्यात मस्क यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, तेव्हा अनेक लोकांचा असा विश्वास होता, की मस्क यांनी भविष्यात त्यांच्या कंपनीला फायदा व्हावा यासाठी योजना आखल्या होत्या.

असे अनुमान होते की ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर मस्क यांचे हीत लक्षात घेऊन आर्थिक बाबींमध्ये काही महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी अधिकारांचा वापर करू शकतात. यामध्ये मस्क यांना एजन्सींमधून सूट देणे, परकीय गुंतवणुकीत प्राधान्य देणे यासारख्या पावलांचा समावेश होता. प्रत्यक्षात अमेरिकेतील बहुतेक संघीय नियामक आणि अभियोक्ते थेट अध्यक्षांना अहवाल देतात. राष्ट्रपतींचा कोणताही आदेश त्यांच्यावर बंधनकारक आहे. तथापि, मस्क आणि ट्रम्प यांच्यातील अंतरामुळे मस्क यांचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. असे मानले जाते की ट्रम्प हे मस्क यांच्या अडचणी वाढवू शकतात. पूर्वीच्या ट्रम्प यांच्या विजयाचे एक मोठे कारण म्हणजे त्यांचा उजव्या विचारसरणीचा मतदारवर्ग. मस्क यांनी ट्रम्प यांना आर्थिक मदत करुनही रिपब्लिकन पक्षाच्या पारंपारिक मतदारांनी ट्रम्प यांना केवळ अध्यक्ष होण्यास मदत केली नाही तर, त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांनाही पाठिंबा दिला. तथापि, आता ट्रम्प त्यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' मोहिमेद्वारे मस्क यांना उजव्या विचारसरणीच्या मतदारांपासून वेगळे करू शकतात. अलिकडेच ट्रॉय नेहल्ससह अनेक खासदारांनी मस्क यांना लक्ष्य केले. याची झलक दिसून आली.

मस्क हे ट्रम्प यांच्यासाठी किती हानिकारक असू शकतात, याचाही लेखाजोखा मांडला पाहिजे. ट्रम्प सरकारविरुद्ध आपला एक्स प्लॅटफॉर्म वळवून मस्क त्यांच्या 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मचा प्रचंड फायदा घेऊ शकतात. मस्क यांचे सध्या एक्सवर २२ कोटी फॉलोअर्स आहेत. मस्क यांनी एके काळी हा आधार ट्रम्प यांच्या बाजूने वळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. यामुळे ट्रम्पना अध्यक्षपदी विराजमान होण्यास मदत झाली. त्यांना आपल्या धोरणांचा प्रचार करण्याची सोपी संधीही मिळाली. मस्क स्वतः 'एक्स'चे मोठे वापरकर्ते असल्याने, ट्रम्प यांच्या धोरणांबाबत प्लॅटफॉर्मवरील भूमिकेवर ते वैयक्तिकरित्या प्रभाव टाकू शकतात. अमेरिकेत नव्या पक्षाच्या स्थापनेबाबत मस्क यांनी 'एक्स'वरच एक सर्वेक्षण केले, तेव्हा याचे संकेत मिळाले. या सर्वेक्षणात ५६ लाख मते पडली, त्यापैकी ८०.४ टक्के लोकांनी मस्क यांना पक्ष स्थापन करण्याबाबत अनुकूल मत दिले. ट्रम्प यांच्याशी झालेल्या वादानंतर मस्क यांचे मोठे नुकसान झाले. तथापि, अमेरिकन मतदारांमध्ये मस्क यांचा फारसा प्रभाव नाही. 'प्यू रिसर्च सेंटर'ने केलेल्या सर्वेक्षणानुसार, दहापैकी पाच प्रौढांमध्ये मस्क यांची प्रतिमा नकारात्मक आहे. तथापि, रिपब्लिकन किंवा उजव्या विचारसरणीच्या मतदारांमध्ये मस्क यांचा खूप प्रभाव आहे. येथे दहापैकी सात लोक मस्क यांना पाठिंबा देतात. अशा परिस्थितीमध्ये मस्क भविष्यात निवडणूक पातळीवर ट्रम्प यांचे नुकसान करू शकतात. एक नवी राजकीय चळवळ सुरू करू शकतात.

अहवालांनुसार, मस्क यांनी २०२४ मध्ये ट्रम्प यांच्या समर्थनार्थ रिपब्लिकन पक्षासाठी सुमारे २५० दशलक्ष डॉलर खर्च केले. सध्या मस्क यांच्या कंपन्यांचा अमेरिकेत तसेच परदेशात व्यवसायात मोठा वाटा आहे. विशेषतः मस्क यांच्या 'स्टारलिंक'ने रशिया-युक्रेन संघर्षादरम्यान युक्रेनला खूप मदत केली. दुसरीकडे, चीनदेखील टेस्लासाठी एक महत्त्वाचे उत्पादन आणि ग्राहक केंद्र राहिले आहे. अशा परिस्थितीत येणाऱ्या काळात मस्क त्यांच्या व्यवसाय आणि राजकीय संपर्काद्वारे जागतिक कंपन्यांवर प्रभाव टाकू शकतात. मस्क यांचे अमेरिकेची अंतराळ संस्था 'नासा' सोबत चांगले संबंध आहेत. 'स्पेसएक्स'च्या माध्यमातून मस्क यांनी सरकारी खर्च वाचवून 'नासा'चे काम खूप सोपे केले आहे. विशेषतः आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अंतराळवीरांना नेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'स्पेसएक्स'च्या ड्रॅगन अंतराळयानाने 'नासा'चा नफा वाढवला आहे. यामुळे 'स्पेसएक्स'ला कोट्यवधींची सरकारी कंत्राटे मिळाली आहेत. अशा परिस्थितीत ट्रम्प यांनी मस्क यांचे सरकारी कंत्राट रद्द करून करोडो रुपये वाचवता येतील, असा इशारा दिला, तेव्हा मस्क यांनी असे पाऊल उचलण्याचे आव्हान दिले. ट्रम्प यांची गुपिते उघड करून मस्क हानी पोहोचवू शकतात. त्यांच्याकडे अनेक गुपिते असू शकतात, असे म्हटले जात असल्यामुळे ट्रम्प अस्वस्थ होऊ शकतात आणि त्यांची प्रतिमा खराब होऊ शकते.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

# 'आनंदऋषीजी'कडून रुग्णांच्या आरोग्य संपत्तीची जोपासना

## डॉ. अशोक लोढा; हृदयरोगावर तज्ज्ञ डॉक्टरांसह हॉस्पिटलची अद्यावत यंत्रणा सज्ज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : निस्वार्थ आरोग्य सेवेतून आनंदऋषीजी हॉस्पिटलने सेवाभाव जपला आहे. या हॉस्पिटल मधील तज्ञ डॉक्टरांनी आपल्या सेवेतून सर्वसामान्यांना विश्वास व आधार देण्याचे काम केले. हृदयरोगाच्या विविध शस्त्रक्रिया येथे अल्पदरात केल्या जात आहे. रुग्णांची आर्थिक संपत्ती न पाहता, आरोग्याची संपत्ती देण्याचे काम या आरोग्य मंदिरातून घडत असल्याचे प्रतिपादन डॉ. अशोक लोढा यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्व. सौ. उज्वलादेवी लोढा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राहाता येथील लोढा परिवाराच्या वतीने घेण्यात आलेल्या मोफत हृदयरोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. लोढा बोलत होते. याप्रसंगी नरेंद्र लोढा, आनंद लोढा, राजेंद्र लोढा, मंगलताई लोढा, प्रकाश लोढा, धनेश लोढा, परेश लोढा, प्रिया लोढा, रुपाली लोढा, पार्थ लोढा, स्नेहा लोढा, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, डॉ. राहुल अग्रवाल, डॉ. अमित थोपटे, डॉ. अनिकेत कटारिया आदी उपस्थित होते. या शिबिरात १२५ रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिरातंर्गत गरजू रुग्णांवर बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, छिद्र बुजवणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया व ॲन्जिओप्लास्टी होणार असून, या शस्त्रक्रिया जनआरोग्य योजनेतून मोफत तर अल्पदरात केल्या जाणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

> खर्चिक व अद्यावत सर्व आरोग्य सुविधा सर्वसामान्यांना आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या एकाच छताखाली उपलब्ध आहेत. अद्यावत ऑपरेशन थिएटर व तज्ञ डॉक्टरांची टीम २४ तास उपलब्ध असून, सर्वसामान्यांना आरोग्य सेवा दिली जात आहे. देशात हृदयरोग शस्त्रक्रियेसाठी हॉस्पिटलचे नाव देशात नावाजले असून, एन्जोप्लास्टीसाठी वेगळी कॅथलॅब उपलब्ध करण्यात आलेली आहे.
>
> **– डॉ. अनिकेत कटारिया**



> जिल्ह्यातील सर्वात जुने व अद्यावत हार्ट सेंटर म्हणून आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्य सुरु आहे. महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेतून हृदय शस्त्रक्रिया मोफत होत असले, तरी त्याचा दर्जा उच्चप्रतिचा राखला जात आहे. इंम्पोर्टेड व उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन शस्त्रक्रिया होत आहे.
>
> **– डॉ. राहुल अग्रवाल**

# 'अशोक'ने थकीत पेमेंटसह दुसरा हप्ता द्यावा : शेडगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : कारखान्याचे सर्वेसर्वा असलेल्या माजी आ. भानुदास मुरकुटे यांनी नुकतेच आठव्यांदा पक्षांतर करुन सत्ताधारी शिवसेना शिंदे गटाचे बोट धरले आहे. या पक्षांतराचा अशोक कारखान्याच्या सभासदा व ऊस पूरवठादार शेतकऱ्यांना लाभ व्हावा. जिल्ह्यातील काही कारखान्याने दुसऱ्या हप्त्याचे पेमेंट केले आहे.

अशोक कारखान्यानेही मागील हंगामाचे थकीत पेमेंट व यंदाचे दुसऱ्या हप्त्याचे पेमेंट करावे, अशी मागणी शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निलेश शेडगे यांनी केली आहे.

प्रसिध्दी पत्रकात शेडगे यांनी म्हटले की, अशोक कारखाना आर्थिक अडचणीत सापडला आहे. कारखान्यात अनेक घोटाळे आहेत. ते चव्हाट्यावर येवू नये तसेच आपल्या नातवाचे राजकीय भवितव्य घडविण्यासाठीच मुरकुटेंनी पक्षांतर केले आहे. स्वतःच्या नातवाची चिंता वाहणाऱ्या मुरकुटेंनी सभासद व कामगारांची मुले उघड्यावर पडत आहेत त्याची फिकीर नसल्याचा आरोप शेडगे यांनी केला आहे.

अशोक कारखान्यात घोटाळे करुन तो पैसा राजकारण, जमिन खरेदी, फ्लट, किमती कार, परदेश दौरे आणि अन्य मौजमजेसाठी ऊधळल्यानेच अशोक कारखाना कर्जबाजारी होवून आर्थिक डबघाईस आला आहे, असे शेडगे यांनी म्हटले आहे.

> आता आठव्यांदा आपले कारनामे झाकण्यासाठी तसेच अशोकच्या कारभाराची चौकशी वाचविण्यासाठीच मुरकुटे यांनी पक्षांतर केले आहे. आता मुरकुटे हे सत्ताधारी पक्षाचे सहकारी झाले असल्याने त्याचा फायदा सभासद व कामगारांना करुन द्यावा. मागील हंगामाचे थकीत असलेले प्रतिटन रुपये तिनशे व सन २०२४-२५ हंगामाचा दुसरा हप्ता प्रतिटन रुपये दिडशे याप्रमाणे द्यावा.
>
> **– निलेश शेडगे**

# कोल्हेंच्या वाढदिवसानिमित्त समाजहिताची सुंदर दिशा

## कोपरगाव बस स्थानक विश्रामगृहास 'संजीवनी'कडून बेड भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष व साईबाबा संस्थान, शिर्डीचे माजी विश्वस्त मा. बिपीन कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त, सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या संजीवनी उद्योग समूहाच्या वतीने कोपरगाव बस स्थानकावरील विश्रामगृहासाठी आवश्यक असणारे बेड भेट देण्यात आले.

हा उपक्रम म्हणजे फक्त औपचारिक उपक्रम नसून कोपरगाव शहरातील सार्वजनिक सेवा क्षेत्रातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व विश्रांतीसाठी दाखवलेली खरी सामाजिक जाणीव आहे. प्रवाशांनाही आवश्यक त्या सुविधा मिळाव्यात, यासाठी संजीवनी युवा प्रतिष्ठान, संजीवनी उद्योग समूह आणि युवानेते विवेक कोल्हे यांचे नेतृत्व सातत्याने कार्यरत असते. बिपीनदादा कोल्हे यांच्या वाढदिवसाला औचित्य साधून संजीवनीच्या दूरदृष्टीतून आणि प्रेरणेने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे कोपरगाव व परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.



बिपीन कोल्हे हे समाजसेवेचा एक आदर्श ठरले आहे. सहकार, शिक्षण, राजकारण,शिक्षण,आरोग्य, रोजगार निर्मिती आणि ग्रामीण विकास अशा अनेक क्षेत्रांत त्यांनी आजवर अमूल्य योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यशैलीत संवेदनशीलता, संवाद आणि सृजनशीलता हे त्रिसूत्री तत्त्व दिसून येते. त्यांनी संजीवनी उद्योग समूहाचे कार्यक्षेत्र आज केवळ कोपरगावापुरते मर्यादित नसून, ते ग्रामीण भागाच्या आत्मसन्मानाशी जोडले गेले आहे.

यावेळी अमृत संजीवनी शुगर केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे चेअरमन पराग संधान, भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष वैभव आढाव, कोपरगाव बस स्थानक आगार व्यवस्थापक अमोल बनकर, डेपो मॅनेजर अविनाश गायकवाड, माजी शहराध्यक्ष डी. आर. काले, दिलीप दारुणकर, राजेंद्र शिंदे, बाळासाहेब नरोडे, रवींद्र पाठक, राजेंद्र सोनवणे, जितेंद्र रणशूर, बबलू वाणी, संदीप देवकर, गोपी गायकवाड, राजेंद्र बागुल, सतीश रानडे, निसारभाई सय्यद, कैलास खैरे, हाशमभाई पटेल, शंकर बिराडे, खालिलभाई कुरेशी, फकीरमोहम्मद पैलवान, स्वप्निल मंजुळ, आकाश वाजे, जयप्रकाश आव्हाड, सचिन सावंत, संतोष साबळे, प्रमोद नरोडे, आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## योग साधना दैनंदिन जीवनाचा भाग बनावा

ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या पुढाकाराने संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शाखांमध्ये योगा दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. योगाचार्य प्रा. सुनिल चोळके यांनी योग साधनेतील विविध प्रकाराच्या आसनाची तसेच प्राणायाम क्रियेची माहिती देवून योगा विषय जनजागृती केली.मागील २० वर्षापासून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेमध्ये ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून योगा साधनेच्या विषयात जनजागृती केली जाते. यासाठी संस्थेतील क्रीडा शिक्षकांना विशेष असे प्रशिक्षण देऊन संस्थेअंतर्गत ६५ योगा शिक्षक विविध ठिकाणी कार्यरत असल्याचे संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी प्रशिक्षकांच्या माध्यमातून विविध गावात योगाचे प्रशिक्षण दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेबरोबरच पद्मश्री विखे पाटील सहकारी साखर कारखाना, पायरेन्स, लोणी कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर या ठिकाणी देखील योगा दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, कॅम्पस संचालक डॉ. आर. ए. पवार आदिसह विभाग प्रमुख उपस्थित होते. डॉ. सुस्मिता विखे म्हणाल्या की, योगा आणि प्राणायाम हे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. केवळ जागतिक योगा दिनानिमित्त योग आणि प्राणायाम करण्यापेक्षा सकाळी प्रत्येकाने आरोग्यासाठी योगा करणे गरजेचे आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या माध्यमातून योगा आता घराघरात पोहचला आहे. या माध्यमातून प्रत्येकाचे आरोग्य सुरक्षित होत आहे. कोव्हीड संकटात ना. विखे पाटील यांच्या माध्यमातून कोव्हीड सेंटरमध्ये योगाचे प्रशिक्षण उपलब्ध करून दिलेले एकमेव कोव्हीड सेंटर हे प्रवरेचे होते.

## थोरात क्रीडा संकुलात योगा शिबिर

सुधिर तांबे म्हणाले, माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरता सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. धावपळीच्या जीवनामध्ये आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सुद्धा आरोग्याला जपा हा मंत्र दिला आहे. याचबरोबर स्वतःच्या शरीराकडे लक्ष द्या, ही शिकवण दिली आहे. योग ही प्रत्येकाने जीवनशैली करावी. दररोज वीस मिनिटे तरी योग करा. योगासनामुळे शरीर लवचिक होत असून शरीरासाठी अत्यंत चांगला असलेला सूर्यनमस्कार हा प्रकार प्रत्येकाने जास्तीत जास्त करावा. तर डॉ.जयश्री थोरात म्हणाल्या की, योग ही भारताची जगाला देण असून योगामुळे शरीर चांगले राहते. योग दिनाच्या निमित्ताने फक्त एक दिवस योग न करता स्वतःसाठी दररोज प्रत्येकाने योग करा. थोडा वेळ स्वतःसाठी काढा. कारण चांगले आरोग्य हीच तुमची मोठी संपत्ती आहे. मन आणि आरोग्य चांगले राहण्यासाठी योगा अत्यंत गरजेचे असून स्वस्थ रहा, मस्त रहा, जबरदस्त रहा असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन व विद्यार्थ्यांना शिक्षण किशोर देशमुख यांनी दिले. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आचार्य बाबुराव गवांदे यांनी केले सूत्रसंचालन डी.व्ही.गुंजाळ यांनी केले तर प्राचार्य के.जी.खेमनर यांनी आभार मानले. यावेळी शहरातील व ग्रामीण भागातील युवक कार्यकर्ते, महिला, तसेच सह्याद्री शिक्षण संस्थेचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी एकवीरा फाउंडेशन च्या वतीने पौष्टिक डिंक लाडूचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

# कोल्हे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य शिबिरे व विविध सामाजिक उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : सहकार क्षेत्रातील प्रगल्भ नेतृत्व आणि संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विशेषतः वृक्षारोपण मोहीम, आरोग्य शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त शालेय साहित्य वाटप, रेनकोट वाटप,पाणी जार वाटप आदींसह विविध उपक्रमांचा समावेश होता.

बिपीनराव कोल्हे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत मतदारसंघातील तब्बल ८९ गावांमध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी वृक्षारोपण चळवळ हाती घेण्यात आली. बदलत्या हवामान परिस्थितीत पर्यावरणाचे रक्षण करणे ही काळाची गरज आहे, हे जाणून बिपीनदादा कोल्हे यांच्या प्रेरणेतून स्थानिक पातळीवर नागरिक, शालेय विद्यार्थी आणि



स्वयंसेवी संस्था यांनी या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

आरोग्यदायी समाज घडवण्यासाठी कोपरगाव मतदारसंघातील चितळी, टाकळी या ठिकाणी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात आली.यासाठी स्नेहलताताई कोल्हे यांनी भेट दिली. यामध्ये आरोग्य शिबिरे आणि रक्तदान शिबिरांना उत्तम प्रतिसाद मिळाला. युवकांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजाप्रती आपली बांधिलकी जपली. बिपीनदादा कोल्हे यांच्या सामाजिक जाणिवेचा प्रत्यय या उपक्रमांतून पुन्हा एकदा आला.

### विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना

विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या शालेय कार्यक्रमांमधून त्यांच्यातील विचारशक्तीला चालना देण्यात आली. शैक्षणिक साहित्य वाटप करून अनोखा संदेश देण्यात आला. शैक्षणिक आणि सामाजिक जाणीवेचा संगम साधत हा वाढदिवस एक सामाजिक उत्सव म्हणून साजरा करण्यात आला.शेकडो ठिकाणी वृक्षारोपण उपक्रम पार पडला यासाठी रेणुकाताई कोल्हे यांची विशेष उपस्थिती होती.

# कारागृहातील आरोपींना योगाचे दिले प्रशिक्षण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : जागतिक योग दिनाच्या निमित्ताने आजजिल्हा विधी सेवा प्राधिकरण अहिल्यानगर व तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्थर अकोले श्री धीरज हिंग्लजकर पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांचे मार्गदर्शनाखाली अकोले कारागृहात सर्व आरोपींना योग प्रशिक्षण देण्यात आले.

याप्रसंगी योग प्रशिक्षक, अधिकार मित्र दत्तात्रय शेणकर, ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष तथा अधिकार मित्र मच्छिंद्र मंडलिक, अकोले सबजेलचे तुरुंग अधिकारी किसन लोहरे इत्यादी हजर होते. या आंतरराष्ट्रीय योगदीनी, कैद्यांना योगाचे महत्त्व व योगामुळे आपल्या शरीरावर व मनावर होणारे परिणाम समजून सांगण्यात आले.



सदर योग प्रशिक्षणामुळे कैद्यांनी आम्हाला आठवड्यातून एकदा योग प्रशिक्षण शिबिर घेण्याची इच्छा व्यक्त केली व सर्व कैदी उत्साही झाल्याचे वातावरण दिसले. कैद्यांच्या या सूचनेचा विचार भविष्यात करू, असे जेल अधिकाऱ्यांनी आरोपींना सांगितले.

# सामान्यांपर्यंत शासकीय सेवा पोहोचवा : लंके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** - तालुक्याच्या उत्तर भागातील खडकवाडी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज राहतो. खासदार निलेश लंके यांच्या प्रेरणेतून बाळासाहेब खिलारी शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवत आहेत. त्यांच्या या कार्याचे कौतुक करावे तेवढे कमी आहे, असे राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके यांनी नमूद केले.

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील खडकवाडी गावात निलेश लंके प्रतिष्ठानने शासकीय सेवा घरपोच मिळाव्यात, या उद्देशाने मोफत कॅम्प आयोजित केला. प्रतिष्ठानचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कॅम्पमध्ये रेशनकार्ड दुरुस्ती, नवीन रेशनकार्ड आणि अभा कार्ड, आरोग्य कार्ड यासारख्या सुविधा मोफत देण्यात आल्या. यामुळे खडकवाडी आणि परिसरातील सर्वसामान्य जनतेला मोठा लाभ झाला.



शासकीय कागदपत्रांच्या बाबतीत सर्वसामान्य जनतेची शासन स्तरावर मोठी नेहमीच पिळवणूक होत असते हे ओळखून या शासकीय सेवा घरपोच मिळाव्यात हा उद्देश समोर ठेवून मतदारसंघात शासकीय सेवांचा रेशन कार्ड कॅम्प आयोजित केला आहे.
**-बाळासाहेब खिलारी.**
अध्यक्ष-निलेश लंके प्रतिष्ठान पारनेर .

कॅम्पच्या उद्घाटनाला राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.या कॅम्पला सामाजिक कार्यकर्ते मोहन रोकडे, युवा नेते अनिल गंधाक्ते, श्रीरंग रोकडे, सरपंच संजय रोकडे, भोद्रे सरपंच अभिजीत झावरे, गंगाधर बांडे, काकणेवाडी सरपंच अशोक वाळुंज, अशोक नऱ्हे, भाऊ निवडूंगे, दादा दळवी, राजू रोकडे, बजरंग गागरे, अशपाक हवालदार, नितीन ढोकळे, विष्णु शिंदे, सुभाष ढोकळे उपस्थित होते.

# नरहरी महाराजांच्या दिंडीचे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : महाराष्ट्र राज्यातून सर्व सुवर्णकार समाज बांधवांच्या वतीने नेवासा येथून काढण्यात येणाऱ्या श्री संत शिरोमणी नरहरी महाराजांच्या पायी पालखी दिंडीचे नेवासा येथून पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

प्रस्थानापूर्वी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या 'पैस' खांबाचे व संत नरहरी महाराजांच्या पालखीतील पादुकांचे पूजन भाविकांच्या उपस्थितीत व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रातील समस्त सुवर्णकार समाजाच्यावतीने १९९७ सालापासून ही दिंडी काढली जाते. दिंडीचे हे २८ वे वर्षे आहे.

या दिंडीच्या प्रस्थानापूर्वी पुष्पांनी सजविण्यात आलेल्या श्री संत नरहरि महाराजांच्या पालखीतील पादुकांचे पूजन नेवासा तहसील कार्यालयाचे निवासी नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे, संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार संदीप चिंतामनी, नेवासा महसूल मंडळ अधिकारी अनिल गव्हाणे यांच्या हस्ते व पालखी सोहळा कमिटीचे मार्गदर्शक आर एम सोनांबेकर, अध्यक्ष सचिन कुलथे सराफ,सरचिटणीस बाळासाहेब दहीवाळ, कृष्णकांत शहाणे, बाळासाहेब शहाणे,पंढरपूर येथील अरुण मंजरतकर, राशीन येथील विजय मैड यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



सोहळयाचे पौरोहित्य नेवासा येथील पांडू जोशी यांनी केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पादुकांचे पूजन झाल्यानंतर पिंपळगाव वाघा येथील सदगुरू डॉ. विकासानंद मिसाळ महाराज यांचे हरि किर्तन झाले. उपस्थित मान्यवरांचा श्री संत नरहरि महाराज पायी दिंडी सोहळा कमिटीच्या वतीने श्रीफळ, प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी समस्त सुवर्णकार समाज बांधवांच्या वतीने दिंडीतील सहभागी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# योग हा ध्यान साधनेकडे घेवून जाणारा मार्ग : बाळासाहेब गोर्डे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : योगामुळे शरीर लवचिक व मजबूत तर बनतेच पण त्याबरोबर मन शांत आणि एकाग्र राहते. चिंता, तणाव, राग यावर नियंत्रण मिळविता येते. मनाच्या एकाग्रतेमुळे विद्यार्थ्यांनाही अभ्यासात फायदा होतो. योगामध्ये आसने, प्राणायाम, ध्यान, शुद्धीक्रिया आणि नैतिक मुल्ये यांचा समावेश असतो. योग हा ध्यान साधनेकडे घेऊन जाणारा मार्ग असून ध्यानातून आत्म्याची ओळख होते. योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचे संतुलन आहे, असे प्रतिपादन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे यांनी केले.



आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुल येथे आयोजित 'जागतिक योगदिन' कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी योग प्रशिक्षक अनिकेत सुसरे यांनी उपस्थित विद्यार्थी, पालक व शिक्षक कर्मचारी यांना योगाचे महत्व समजावून सांगितले. तसेच त्यांनी योगाचे प्रात्याक्षिके करून दाखवून उपस्थितांकडून योग, प्राणायाम व ध्यान करून घेतले. संकुलाच्या विद्यार्थीनींनी संगीत योगा सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या योगदिन कार्यक्रम प्रसंगी आश्रमाचे उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, विश्वस्त प्रकाश गिरमे, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, श्रीमती पटेल, प्राचार्य निरंजन डांगे, माणिक जाधव, संदीप गायकवाड, नामदेव डांगे, नितीन सोनवणे, दिनकर राऊत, अशोक शिंदे, दीपक आहेर आदी मान्यवर उपस्थित होते.

# मराठा समाजाच्यावतीने होणार गुणवंताचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : अखंड मराठा समाज श्रीरामपूरच्या वतीने महाराष्ट्र राज्य स्पर्धा परीक्षासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या सर्व समाजातील गुणवंतांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

सोमवार दिनांक २३ जून रोजी दुपारी ४ वा. श्रीरामपूर येथील मेनरोडवरील आगाशे सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य स्पर्धा परीक्षांमध्ये त्याचबरोबर विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या गुणवंतांचा सत्कार सोहळा संपन्न होणार आहे. यावेळी सन्मानचिन्ह देऊन गुणवंतांना सन्मानित केले जाणार आहे. अखंड मराठा समाजाने आयोजित केलेल्या या सत्कार सोहळ्यात मराठा समाजाबरोबरच इतरही समाजातील गुणवंतांचा सत्कारार्थींमध्ये समावेश करण्यात आला आहे.या सत्कार सोहळ्यासाठी सर्व समाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखंड मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये योगदिन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ (कला) महाविद्यालय कोल्हार बु. ता. राहाता जि. अहिल्यानगर विद्यालयात जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सकाळी सात ते नऊ वाजेपर्यंत दोन तास विविध योगासने केली विद्यालयातील उपमुख्याध्यापक सिताराम बोरुडे व क्रीडा शिक्षक दीपक मगर सर यांनी एक दिवस अगोदरच सर्व विद्यार्थ्यांना योगासना विषयी माहिती सांगून कशा पद्धतीने योगासने करावीत याची प्राथमिक माहिती दिली होती. यानंतर विद्यार्थ्यांकडून वेग- वेगळी योगासने



करून घेण्यात आली. यावेळी कोल्हार गावातील योगशिक्षिका मंगल मोरे यांनी योग केल्याने होणारे फायदे याविषयी माहिती देऊन योगसाधनेचे महत्त्व सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुशराज जामदार यांनी सुद्धा काही योगासनाची माहिती सांगून योगासने करून दाखवविली. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती संजीवनी आंधळे, ज्येष्ठ शिक्षक शब्बीर शेख, सुधीर फुलारी, शुभम पवार यांनी विद्यार्थ्यांकडून योगासनाची तयारी करून घेण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# जोशी मराठी शाळेत योगदिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : दादा वामन जोशी मराठी शाळेत योगदिन उत्साहात साजरा झाला. दरवर्षी २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून जगातील बहुसंख्य देशात साजरा केला जातो. रोज प्राणायाम व योगासने केली तर आपण निरोगी व सुदृढ राहतो.आपल्याला दैनंदिन कामे उत्साहाने करता येतात. २१ जून हा आशिया खंडातील सर्वात मोठा दिवस आहे.आपल्या देशाचे पंतप्रधाननरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने संपूर्ण भारत देशात २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगदिन म्हणून साजरा केला जातो.

यावर्षीही २१ जून रोजी हिंद सेवा मंडळ अहिल्यानगरचे



मानद सचिव संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर येथील दादा वामन जोशी नवीन मराठी शाळा व क. जे. सोमैया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या शाळेतील विद्यार्थ्यांची योगदिनानिमित्त प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये हिंद सेवा मंडळाचे सहसचिव व सोमैया हायस्कूलचे चेअरमन रणजित श्रीगोड, दादा वामन जोशी मराठी शाळेचे चेअरमन ऋषीकेश जोशी, बालवाडी विभागाचे चेअरमन सुशील गांधी, ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन जितेंद्र अग्रवाल, दादा जोशी मराठी शाळेचे मुख्याध्यापक सचिन मुळे, सोमैया हायस्कूलचे मुख्याध्यापक भुषण गोपाळे, हिंद सेवा मंडळाचे सेवक प्रतिनिधी कल्याण लकडे, प्रशासकीय अधिकारी बी. एस. कांबळे सहभागी झाले होते.

प्रभातफेरी नंतर शाळेच्या मैदानावर दोन्ही शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे एकत्रित योगासने व प्राणायाम प्रकार शहरातील प्रसिद्ध योगशिक्षिका प्रभा बधे, मनिषा भिसे, ॲड. सोनाली त्रिभुवन, मयुरी तिलोतमा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगल वाघ, ज्योती काथे यांनी केले.

# पाथर्डी तालुक्यात योगदिन उत्साहात साजरा

## योग साधनेतून निरोगी जीवनाची प्रेरणा; आमदार मोनिका राजळे यांचे प्रतिपादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : २१ जून रोजी संपूर्ण भारतात साजऱ्या होणाऱ्या जागतिक योग दिना निमित्त पाथर्डी तालुक्यात विविध ठिकाणी योग शिबिरांचे आयोजन करून योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दादापाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथनगर येथे भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार मोनिका राजळे स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांसोबत योगासने केली. जागतिक योग दिन आपल्याला निरोगी शरीर आणि शांत मनाचे रहस्य उलगडतो. योग ही भारताची अमूल्य ठेव असून तणावमुक्त जीवनासाठी आवश्यक आहे,असे प्रतिपादन आमदार राजळे यांनी यावेळी केले.

दरम्यान, बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या लोकनेते गोपिनाथ मुंडे इनडोअर स्टेडियम येथे आमदार मोनिका राजळे व पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून



गट शिक्षणाधिकारी रामनाथ कराड म्हणाले की, योग हा मन, शरीर आणि आत्म्याच्या संतुलनाचा मार्ग आहे. प्रत्येकाने दररोज योगसाधना करून स्वतःला सशक्त बनवावे, अशी प्रेरणा त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. तालुक्यातील विविध शाळांमध्ये योगदिन साजरा करण्यात आला असल्याचेही कराड यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.योग शिक्षक राधाकृष्ण दरवडे व कॅप्टन अजय पालवे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने प्रत्यक्ष दाखवत योगाचे महत्त्व पटवून दिले. ज्येष्ठ नेते अशोक चोरमले, नामदेव लबडे, मंगल कोकाटे, ज्योती शर्मा, प्राचार्य डॉ. बबन चौरे, प्रा. डॉ. विजय देशमुख, पर्यवेक्षक सलिम शेख, शेखर ससाणे, आशा पालवे, शशिकांत काळोखे, डॉ. किरण गुलदगड, अभिमन्यू ढोरमारे यांची उपस्थिती लाभली.

तिलोक जैन विद्यालयात देखील योग दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी गट शिक्षणाधिकारी रामनाथ कराड, प्राचार्य अजय भंडारी, उपप्राचार्य अशोक गर्जे, पर्यवेक्षक भारत गाडेकर, बाळासाहेब वामन यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पर्यवेक्षक मनीषा मिसाळ, अजय शिरसाट, बाळासाहेब गांगुर्डे, संध्या पालवे, सुनील शेटे यांनी उपस्थितांना योगासने करून घेतली.

# अधिकाऱ्यांनो, तृतीयपंथीयांसाठी संवेदनशीलपणे काम करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आदेश; जिल्हाधिकारी कार्यालयात तृतीयपंथीयांसाठी कार्यशाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी संवेदनशीलपणे काम करावे. समाजामध्ये त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी शासनाच्या सर्व योजनांचा तृतीयपंथीयांना प्राधान्याने लाभ देऊन देशासह राज्यात जिल्ह्याची वेगळी ओळख निर्माण करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

> तृतीयपंथीय समुदायावर अजूनही अनेक प्रकारची सामाजिक, मानसिक व आर्थिक कुचंबणा होत आहे. त्यांना शिक्षण, रोजगार व आरोग्यसेवेत समान संधी मिळणे आवश्यक आहे. लैंगिकता ही व्यक्तीची ओळख असते. ती केवळ स्त्री किंवा पुरुष या परंपरागत चौकटीत मावणारी नसते. समलैंगिक, उभयलिंगी, तृतीयपंथीय व ट्रान्सजेंडर व्यक्तींचा समाजात सकारात्मक स्वीकार व्हावा, यासाठी सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.
>
> **– पिंकी शेख**

जिल्हाधिकारी कार्यालयात तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, लेखिका-कवयित्री पिंकी



शेख, जिल्हास्तरीय समितीच्या सदस्य काजलगुरु नगरवाले, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, समाजकल्याण निरीक्षक संगीता चितळे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, समाजामध्ये तृतीयपंथीयांबाबत अनेक गैरसमज आहेत. समाजाचा त्यांच्याविषयीचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. तृतीयपंथीय शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे त्यांना उदरनिर्वाहासाठी भिक्षेवर गुजराण करावी लागते. तृतीयपंथीयांना त्यांच्या पायावर उभे राहून समाजात सन्मानाने जगता यावे, यासाठी कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यात यावे. उद्योग उभारणीसाठी दायित्व निधीतूनही निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, शासकीय सेवेच्या कालावधीत अशा प्रकारची कार्यशाळा प्रथमच अनुभवतो आहे. तृतीयपंथीय हा समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक तृतीयपंथीयापर्यंत

> तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. तृतीयपंथीयांची ऑनलाईन नोंदणी, संजय गांधी निराधार अनुदान, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका यांसारख्या योजनांचा लाभ देण्यात आला आहे. श्रीरामपूर तालुक्यात तृतीयपंथीयांसाठी घरकुल संकुल व स्मशानभूमीसाठी ३ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तृतीयपंथीयांनी आत्मनिर्भर व्हावे, यासाठी मौजे चितळी येथे शेळीपालन व्यवसायही सुरू करण्यात आला आहे.
>
> **– प्रवीण कोरगंटीवार, सहायक आयुक्त**

पोहोचविण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रसन्ना धुमाळ यांनी केले. तर आभारप्रदर्शन समाजकल्याण निरीक्षक संगीता चितळे यांनी केले. कार्यशाळेला सर्व विभाग प्रमुख तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# तिसगावच्या आठवडे बाजारचा प्रश्न ऐरणीवर

## नदी नाल्याच्या दुर्गंधी जवळ बसून शेतकऱ्यावर भाजी विक्रीची वेळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील तिसगाव एक मोठे व्यापारी बाजारपेठेचे शहर म्हणून ओळखले जाते तिसगाव येथे दर गुरुवारी आठवडे बाजार भरतो. या आठवडे बाजारामध्ये भाजी खरेदी विक्रीसाठी परिसरातील पंधरा ते वीस गावचे लोक येथे येतात. त्यामुळे आठवडे बाजारच्या दिवशी या ठिकाणी मोठी गर्दी होते.

परंतु, गेल्या अनेक दिवसापासून या ठिकाणी आठवडे बाजारच्या जागेचा प्रश्न गंभीर बनला असून बहुतांश भाजी विक्रेते कल्याण-निर्मळ या राष्ट्रीय महामार्गवरच भाजी विक्रीसाठी बसतात. त्यामुळे या ठिकाणी नेहमी वाहतूक कोंडी होते. तिसगावचा आठवडे बाजार बाजारसाठी मोठी सुसज्ज अशी जागा उपलब्ध नसल्यामुळे

### तिसगाव अडकले अतिक्रमणाच्या विळख्यात

पोलीस प्रशासनाने पंधरा दिवसापूर्वीच ग्रामपंचायतला पत्र देऊन आठवडे बाजारला सुरक्षित जागेची व्यवस्था करण्याचे आवाहन केले आहे. तिसगावमधील नदी नाल्यांसह ग्रामपंचायतीच्या जागावर ताबा मारण्याचे प्रकार वाढल्याने संपूर्ण तिसगाव अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले आहे.

अनेक शेतकरी नदी नाल्याजवळ दुर्गंधीच्या ठिकाणी स्वतःचे आरोग्य धोक्यात घालून भाजी विक्रीसाठी बसत आहेत.

एवढेच नव्हे, तर आजूबाजूच्या अनेक लोकांनी ग्रामपंचायतच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्यामुळे आठवडे बाजारला जागाच शिल्लक राहिलेली नाही. शेतकऱ्यांना तसेच भाजी खरेदी करण्यासाठी आलेल्या नागरिकांना देखील स्वतः चा जीव धोक्यात घालून या ठिकाणी भाजी विक्री करावी लागत आहे. ज्या ठिकाणी शेतकरी भाजी विक्रीसाठी बसतात तेथूनच मोठ्या प्रमाणात गावातील सांडपाणी वाहत आहे आणि त्याची दुर्गंधी देखील मोठ्या प्रमाणात येत आहे.

नदीकाठच्या लोकांनी जागा खरेदी करून रस्त्यापर्यंत नदीच्या पात्रात मालकी हक्क सांगत जागा बळकवण्याचा प्रयत्न केला आहे. तर काहींनी ग्राम पंचायतच्या जागेतच पत्र्याचे शेड टपऱ्या उभ्या केल्याने आठवडे बाजारच्या दिवशी शेतकऱ्यांनी व्यापार करण्यासाठी कुठे



### बाजारामुळे होतेय वाहतूक कोंडी

एवढेच नव्हे, तर तिसगावच्या अनेक दुकानासमोरच भाजी विक्रेते बसत असल्यामुळे त्यांच्याही व्यवसायाचा प्रश्न आठवडे बाजारच्या दिवशी निर्माण होत आहे. बाजारतळापासून वृद्धेश्वर चौकापर्यंत भाजी विक्रेते बसु लागल्यामुळे हा संपूर्ण परिसर आता गुरुवारच्या दिवशी वाहतूक कोंडीच्या दृष्टीने मोठा अडचणीत ठरत आहे.

बसायचं असा देखील मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. काही लोक आठवडे बाजारच्या दिवशी महामार्गाच्या कडेलाच दोन चाकी चार चाकी वाहने उभी करून बाजारात फेरफटका मारतात अशावेळी सुद्धा वाहतूक कोंडी होत आहे.

# हरिहर महाराज पायी दिंडीचे बुधवारी प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील इसळक-निबळक येथील श्री क्षेत्र कोटीलिंग तीर्थ येथून सालाबादप्रमाणे बुधवारी २५ जूनला रोजी श्री समर्थ सदगुरु योगीराज महाराज हरिहर महाराज पायी दिंडी सोहळा पंढरपूर आषाढी दिंडीसाठी प्रस्थान करणार असून दिंडीचे हे ६० वे वर्ष आहे.

समर्थ हरिहर महाराज संस्थान संचालित हि दिंडी असून इसळक-निबळक येथील श्री क्षेत्र कोटीलिंग तीर्थ येथून बुधवारी २५ जूनला रोजी संध्याकाळी ५ वाजता निघणार



आहे. यावेळी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती डॉ. जालिंदर महाराज निकम यांनी दिली आहे.

दिंडी सोहळा कोटीलिंग तीर्थ निघाल्यावर पहिला मुक्काम निबलक येथे राहणार असून दुसऱ्या दिवशी दिंडी नगरमधील भुतकरवाडी येथील यादवराव खेडकर यांच्या येथे दुपारचे जेवण घेणार आहे व पुढे माळीवाडा येथे मोकाटे यांच्या येथे मुक्कामी राहणार आहे.

दि. २७ जूनला दिंडी सोहळा वाकोडी फाटा मार्गे पुढे जाऊन रात्रीचा मुक्काम नगर तालुक्यातील रुईछत्तीशी येथे राहणार आहे. तर पुढे करमाळा मार्गे पंढरपूरला हा सोहळा पोहचणार आहे. द्वादशीला काल्याचा प्रसाद झाल्यानंतर दिंडी सोहळा विसर्जित होणार आहे.

> दिंडी सोहळाचा पंढरपूर येथील मुक्काम हरिहर महाराज संस्थान,बार्शी नगर रोड, शेगाव दुमला, पंढरपूर येथे राहणार आहे. ज्यांना या दिंडी सोहळ्यात सहभागी व्हायचे त्यांनी दि. २५ जूनला रोजी संध्याकाळी ५ वाजता वाजता इसळक-निबळक येथील श्री क्षेत्र कोटीलिंग तीर्थ येथे उपस्थित राहावे व दिंडीत वारकऱ्यांनी शिस्त पाळावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# दुभाजकांची दिशा-दशा बदलल्याने वाहतुकीस अडथळा

## राहात्यात रस्त्यावरील प्रकार; सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासनाचे दुर्लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** राहाता शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड महामार्गावरील दुभाजकांची गुरूवारी दिशा आणि दशा बदलल्याने वाहतुकीस अडथळा होत होता. तर रिमझिम पावसात वाहन चालवतांना वाहन चालकांना कसरत करावी लगत होती झाला. परंतु, दुभाजक व्यवस्थित करण्यावर प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून आले.

गुरुवारी राहाता शहराचा बाजार भरतो. त्यावेळी मोठ्या प्रमाणात गर्दी असते, यासाठी अग्निशमन दलाची

### अपघात होण्याची दाट शक्यता

काही दुभाजक मोठे आहेत. तर काही दुभाजक फक्त २ इंच पाईपासारखे आहे. त्यामुळे हे दुभाजक रस्त्यात पडून अपघात होण्याची शक्यता आसल्याने हे दुभाजक बदलने गरजेचे आहे.



गाडी तसेच पोलिस बंदोबस्त असतो. परंतु बाजार तळाच्या समोरून जाणाऱ्या नगर-मनमाड रस्त्यावरील दुभाजक रस्त्याच्या दुभाजनापासून बाजूला झाले होते. त्यामुळे एक बाजूचा रस्ता मोठा तर एक बाजूचा रस्ता लहान तसेच दुभाजक आडवे झाल्याने प्रवशांची अडचण झाली. हे दुभाजक फायबरचे असल्याने गाडीचा छोटासा धक्का जरी लागला तरी ते विस्कळीत होतात. त्यामुळे हे दुभाजक बदलण्याची गरज आहे.

# प्रपंचात राहून परमार्थात हरिभक्तीचा मार्ग

## हभप माधव महाराज; जिव्हाळेश्वर दिंडी रथाचे अर्बन बँक कॉलनीत भाविकांकडून स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** वारकरी संप्रदायाचे पांडूरंग हे दैवत आहे. रामकृष्णहरी या जपाने वारकरी मंत्रमुग्ध होत असतात. वारकरी संप्रदाय हा मनामनाची मशागत करणारा आहे. प्रपंच्यात राहून परमार्थाचा विचार करणे हा हरिभक्तीचा मार्ग आहे.असे विमोचन हभप माधवराव महाराज पाटील यांनी केले.

नगर शहरात पहिल्याच खान्देश येथील पायी दिंडी व जिव्हाळेश्वर महादेव रथाचे अर्बन बँक कॉलनीत भाविकांकडून स्वागत करण्यात आले. याप्रसंगी हभप माधवराव महाराज पाटील, हभप युवराज महाराज, हभप दगाशी महाराज, अभिमन पाटील, बळवंत



पाटील, आदिनाथ जोशी, अभिजित जोशी, माजी नगरसेविका संगिताताई खरमाळे, रुपालीताई वारे, माजी नगरसेवक अमोल गाडे, मनपाचे माजी उपायुक्त रामकिसन देशमुख संदिप यादव, सचिन गाडे आदि उपस्थित होते.

या दिंडी सोहळ्यात वारकऱ्यांना चहा, बिस्किटे, अल्पोपहार देण्यात आला. यावेळी ॲड. सतीश उदास, डॉ. ओंकार कुलकर्णी, ॲड. भाऊसाहेब दरवडे, तसेच अल्पोपहारासाठी अजय घोलप अशविनी अध्यापक तसेच भाविकांनी मोठ्या प्रमाणावर योगदान दिले. कॉलनीतील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री क्षेत्र कन्हेरे ते श्री क्षेत्र पंढरपुर दिंडीचे २९ वे वर्षेअसून, जिव्हाळेश्वर महादेव रथासह या पायी दिंडीत वारकरी मोठ्या संख्येने सहभागी होतात, असे ह.भ.प. माधव महाराज पाटील यांनी सांगितले.

# कान्होबा देवस्थानावरून वाद करणे भोवले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा गावातील कान्होबा देवस्थान येथे पूजा-अर्चनेच्या मुद्द्यावरून दोन समाजांमध्ये वाद निर्माण होऊन मोठा तणाव निर्माण झाल्याची घटना १९ जून २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास घडली. या वादानंतर दोन्ही गटांनी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दिल्या असून एकूण ६० जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले

### नागरिकांनी संयम बाळगावा : पोलिसांकडून आवाहन

दोन्ही तक्रारींनंतर पाथर्डी पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवले गेले. या दोन्ही गुन्ह्यांचा तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये करत आहेत. पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी गावात संयम बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




आहेत. या प्रकरणात पहिल्या गटातील २८ आरोपींविरुद्ध, तर दुसऱ्या गटातील ३२ आरोपींविरुद्ध, धार्मिक भावना दुखावणे, जबरदस्तीने पूजा करण्यास अडथळा आणणे, मारहाण, शिवीगाळ, धमकी, तसेच शांतता भंग करण्याच्या आरोपाखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### दोन्ही गटांतील तब्बल ६० जणांवर गुन्हे दाखल

प्रारंभी, गावातील काही ग्रामस्थांनी देवस्थानात पूजा करण्यासाठी गेल्यावर विरोध करणाऱ्या व्यक्तींनी मारहाण केली, मंदिराला कुलूप लावले, असा आरोप करत तक्रार दिली. तर दुसऱ्या गटाने पूजा करण्याच्या नावाखाली जबरदस्ती, गाभाऱ्यात घुसखोरी व पुजाऱ्यांना मारहाण केल्याचा आरोप करत पोलिसांत तक्रार दाखल केली.

# शिवसेनेच्या मीराताई शिंदे जिजाऊ गौरव पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** जिजाऊ ब्रिगेडच्या रौप्य महोत्सवी वर्षा निमित्ताने आहिल्यानगर येथे जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकारी यांचा मेळावा दि. १४ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्रीगोंदा येथील पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्या ,शिवसेना जिल्हा प्रमुख मिराताई शिंदे यांना जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश अध्यक्ष शिवमती सीमाताई बोके यांच्या हस्ते जिजाऊ गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



यावेळी विजयकुमार ठुबे, जिजाऊ ब्रिगेडच्या आंतरराष्ट्रीय कार्याध्यक्ष सुजाता ठुबे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अश्विनी देवके, कार्याध्यक्ष राजश्री शितोळे, जिल्हाध्यक्ष स्वाती जाधव, विभावरी ताकट, सुरेश इथापे, अशोक कुटे, भारती इंगवले आदी उपस्थित होत्या.

# विद्युत पुरवठा सुरळीत करा, अन्यथा जनआंदोलन

## माजी सभापती मनोज कोतकर; केडगाव उपनगरात विजेचा लपंडाव ; नागरिक त्रस्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** केडगाव उपनगराचा गेल्या एक महिन्यापासून विजेचा लपंडाव चालू असल्यामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक अक्षरशा त्रस्त झाले आहे. विद्युत विभागाकडून कुठलीही पूर्वसूचना न देता रात्री-अपरात्री लाईट जात असल्यामुळे नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागत आहे.

पावसाळ्याचे दिवस सुरू असून विद्युत विभागाने अडथळा ठरणाऱ्या झाडाच्या फांद्या पावसाळ्यापूर्वी तोडणे गरजेच्या होत्या, मात्र कुठल्याही उपयोजना झालेल्या दिसत नाही. लाईट संदर्भात कुठलीही पूर्वसूचना न देता वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये विद्युत विभागाच्या विरोधात संतापाची लाट असून, येत्या आठ दिवसात केडगाव उपनगराचा विजेचा प्रश्न कायम

> दौंड रस्ता, सोनेवाडी रस्ता, पुणे महामार्ग, लिंक रोड, लोंढे मळा, केडगाव देवी रस्ता विजे अभावी अक्षरशा अंधारात असतात. तरी विद्युत विभागाने येथे आठ दिवसात केडगाव उपनगराचा विजेचा प्रश्न न सोडविल्यास कुठलीही पूर्व सूचना न देता तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल.
>
> **– मनोज कोतकर, माजी सभापती**

स्वरूपी मार्गी लावा. अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा सहाय्यक अभियंता राहुल शिलावत यांना निवेदनाद्वारे माजी सभापती मनोज कोतकर यांनी दिला.

मनोज कोतकर निवेदनात म्हणाले की, केडगाव उपनगरामध्ये नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास आली




आहे. मात्र विद्युत विभागाच्या ट्रांसफार्मरची संख्या कमी आहे. दोन पोलमधील अंतर जास्त असल्यामुळे तारा अक्षरशा लोम्बकाळात आहे. त्यामुळे देखील वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. तसेच या परिसरामध्ये शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने राहत असल्यामुळे त्यांची विजेवरची उपकरणे चालत नसल्यामुळे त्यांचे देखील हाल होत आहे.

तसेच व्यसाय करणाऱ्या नागरिकांची लाईट अभावी मोठे आर्थिक नुकसान होत आहे. विद्युत विभागाचा दूरध्वनी क्रमांक कायमस्वरूपी बंद असतो, त्यामुळे नागरिकांनी तक्रार कुठे करायची तसेच कर्मचारी अपुरे असल्यामुळे झालेला प्रॉब्लेम तातडीने सोडवता येत नाही. त्यामुळे केडगावकरांना अक्षरशः एक-एक दोन-दोन दिवस अंधारात काढावी लागतात, विद्युत विभागाकडे केडगावच्या वीज प्रश्न संदर्भात वारंवार लेखी निवेदने दिले आहे. तीव्र स्वरूपाचे आंदोलने देखील केले आहे. मात्र प्रश्न सुटला जात नाही.

# योगाचे व्यसन जडावे ही काळाजी गरज

## पद्मश्री डॉ. पवार; हिवरेबाजार येथील जि.प. प्राथमिक शाळेत योगदिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हिवरेबाजार** : योगसाधना ही केवळ शारीरिक शक्तीसाठीच नव्हे तर मनोविकासाकडून मनःशांतीकडे घेऊन जाणारी साधना असल्यामुळे प्राचीन काळापासून जगात सर्वश्रेष्ठ ठरली आहे व आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत तणावमुक्त जीवन जगण्यासाठी योगाभ्यासाचे व्यसन जडणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पद्मश्री डॉ. पोपटराव पवार



यांनी केले. अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आदर्शगाव हिवरेबाजार येथील जि.प. प्राथमिक शाळा आणि यशवंत माध्यमिक विद्यालय आयोजित जागतिक योगदिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. चुकीच्या जीवनशैली, चुकीची आहार पध्दती, व्यायामाचा अभाव यामुळे अनेकांच्या जीवनात तणाव वाढत आहे.

त्यामुळे अनेकांचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य धोक्यात आले आहे. जीवन निरोगी व शरीर सदृढ राहण्यासाठी नागरिकांनी योग-प्राणायाम करण्याची गरज आहे. निरोगी शरीरासाठी योग हा महत्वाचा असून मानवी शरीराची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आणि आपला आत्म विश्वास दृढ करण्यासाठीही योग म हत्वाचा आहे,योग ही आरोग्यासाठी आणि समाजासाठी अतिशय म हत्वाची आणि मौल्यवान देणगी आहे. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी तसेच अभ्यासावर त्यांची एकाग्रता वाढवण्यासाठी योगाच्या रोजच्या सरावाने चांगला लाभ होतो. स्पर्धेच्या व धावपळीच्या युगात प्रत्येक व्यक्ती व्यायामापासून दुरावत असून, ताण-तणावाखाली वावरत आहे, असे पवार म्हणाले. एनसीसी छात्रांबरोबर व विद्यार्थ्यांबरोबर पोपटराव पवार यांनीही योग प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला. योग विद्या धामचे योगशिक्षक अनिरुद्ध भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली योग सत्र यशस्वीरित्या पार पडले.

कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक मुरलीधर अमृते, बाबा जाधव, दिपक ठाणगे, विजय ठाणगे, राजू नरवडे, शोभाताई पवार, कैलास खैरे, एनसीसी प्रमुख नंदकुमार झावरे व सर्वांना छात्र तसेच सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, पालक यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमाचे कर्नल प्रसाद मिजार, सुभेदार मेजर राजेश राव यांनी एनसीसी विभागाचे विशेष अभिनंदन केले.

# अवैद्य दारूविक्री विरोधात कारवाई

## ५ आरोपींवर गुन्हे दाखल; पोलिसांची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : शहरात सुरू असलेल्या अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी मोहिम उघडली असून विविध ठिकाणी कारवाई करीत ५ आरोपींविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आर-ोपी बाबासाहेब प्रभाकर बावणे, विश्वनाथ शंकर दगडखैर, विष्णु भिमराज ताठे, राजेंद्र यादव कचरे, एकनाथ कृष्णा दराडे असे आरोपींची नावे आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, गुप्त खबऱ्यामार्फत शहरात विविध ठिकाणी अवैध दारू विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी देशी व विदेशी दारूची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या पाच जणांवर छापे टाकून गुन्हे दाखल केले. ही कारवाई एकाच दिवशी केल्याने अवैद्य दारू विक्री करणाऱ्यांचे



धाबे दणाणले आहेत. पाथर्डी पोलीस स्टेशनचे निरीक्षक विलास पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. एकूण पाच ठिकाणी छापे टाकून ६३ देशी व विदेशी दारूच्या सीलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या असून एकूण किंमत सुमारे ७,३८० रुपये इतकी आहे. सर्व आरोपींकडून मुद्देम ाल ताब्यात घेऊन, प्रकरणी मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही आहेत कारवाईतील पाच वेगवेगळ्या ठिकाणा पाथर्डी पोलिसांनी कारवाई केली.

# ढोकेश्वर कॉलेजमध्ये जागतिक योगदिन साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळी ढोकेश्वर** : पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन सकाळी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय योग दिनामध्ये सर्वजण सहभागी झाले होते. या कार्यक्रमांमध्ये प्रा.किशोर कांबळे यांनी सर्वांना योगाच्या संदर्भात तसेच प्राणायाम याची महत्व सांगितले व विविध बैठे आसणं व उभी आसणे सर्वांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी देखील योगासणांचे आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसाला शांत व संयमी तसेच निरोगी ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. नियमित योगसाधना केल्यास आपण पूर्णपणे निरोगी, उत्साही राहू शकतो व आपले दैनंदिन काम उत्साहात पार पाडू शकतो असा मौलिक संदेश माननीय प्राचार्य यांनी दिला. या कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ .शांताराम साळवे यांनी व्यक्त केले.

# वारकरी संप्रदाय त्यागाची शिकवण देणारा

## डॉ. थोरात; मनोली ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : वारकरी संप्रदाय हा अध्यात्मिकते बरोबरच समतेची व त्यागाची शिकवण देणारा आहे. आपण सर्वच जण विठ्ठलाला मानणारे असून वारीच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने एक वेगळाच सात्विक अनुभव येत असल्याचे प्रतिपादन एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. जयश्री थोरात यांनी केले आहे. तालुक्यातील मनोली येथे मनोली ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा प्रस्थान प्रसंगी त्या उपस्थित होत्या. यावेळी दिंडी चालक राधाकिसन शिंदे, सुखदेव शिंदे यांसह बाळासाहेब शिंदे मोठ्या भाऊ शिंदे, विठ्ठल शिंदे, विलास क्षीरसागर, प्रभाकर बेंद्रे, गंगाधर चव्हाण, काशिनाथ साबळे, वसंत शिंदे, नारायण भागवत, निवृत्ती ठोसर, अरुण जोंधळे, रघुनाथ रिंगे, पुंजाबाई साबळे, शंकर शिंदे, बारकू ठोसर, भास्कर शिंदे, रावसाहेब शिंदे, लहान भाऊ गाडेकर, साहेबराव ठोसर, एकनाथ पराड, विठ्ठल गोराणे, सोमनाथ थोरात उपस्थित होते.

# कत्तलीच्या उद्देशाने नेणाऱ्या गायींची सुटका

## दोघांविरोधात पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यातील घुमटवाडी शिवारात गो-वधासाठी बेकायदेशीररित्या तीन गायी वाहून नेणाऱ्या टेम्पोचा पर्दाफाश करण्यात गोरक्षकांनी केला असून, या प्रकरणी दोघांविरोधात पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष बाळासाहेब शिंदे (वय २६, रा. कसबा पेठ, पाथर्डी) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २० जून रोजी रात्री ९.३० वाजता त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक महिंद्रा जितो टेम्पो (क्र. एम एच २३ ए यू १०५३ ) घुमटवाडी येथून तीन गायी कत्तलीसाठी आष्टी तालुक्यातील धामणगाव पाण्याचे येथे नेत आहे.




ही माहिती मिळताच शिंदे आणि त्यांच्यासोबतचे मिलिंद काळे, आशुतोष शर्मा, ज्ञानेश्वर सातपुते, नवनाथ सोनटक्के आणि सुरेश पालवे यांनी खाजगी वाहनाने घटनास्थळी धाव घेतली. घुमटवाडी-चेकेवाडी रस्त्यावर त्यांनी संशयित टेम्पो थांबवून पाहणी केली असता, त्यात तीन गायी आढळून आल्या. या गायींच्या चारा, पाणी किंवा औषधोपचाराची कोणतीही व्यवस्था नव्हती. तसेच, टेम्पोचालकाकडे कोणताही कायदेशीर वाहतूक परवाना आढळून आला नाही.

टेम्पोचालकाने आपले नाव वसीम इस्लाम सय्यद (वय २८, रा. धामणगाव पाण्याचे, ता. आष्टी, जि. बीड) असे सांगितले. त्याने गायी गुणाजी रामसिंग चव्हाण (रा. घुमटवाडी, ता. पाथर्डी) यांच्याकडून खरेदी करून नेल्याचे कबूल केले. त्यानंतर गुणाजी चव्हाण यांना घटनास्थळी बोलवून विचारणा केली असता त्यांनी देखील गायी विक्रीचे कबुली दिली.या संपूर्ण प्रकरणाची माहिती पाथर्डी पोलिसांना देण्यात आली.

# दिंडी मार्गावर महानगरपालिकेकडून साफसफाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : येत्या दोन दिवसात अहिल्यानगर शहरातून दिंड्या मार्गस्थ होणार आहेत. त्यांच्या मुक्काम ाच्या ठिकाणी व दिंडी मार्गावर महानगरपालिकेकडून पिण्याचे पाणी व शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मार्केटयार्ड परिसरात दिंडी मुक्कामी राहणार असल्याने या ठिकाणी महानगरपालिकेने संपूर्ण साफसफाई केली असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातून जाणाऱ्या काही पालख्या अहिल्यानगर शहरात मुक्कामाला असतात. शहरातून जाणाऱ्या दिंडी



मार्गावर वारकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेने नियोजन केले आहे.

शहरातील दिंडी मार्गावर पिण्याचे पाणी, पेट्रोल पंपाच्या ठिकाणी पंप चालकांशी संपर्क साधून स्वच्छता गृहाची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मार्केटयार्ड परिसरात दिंडी मुक्कामी असल्याने या ठिकाणी संपूर्ण स्वच्छता करण्यात आली आहे. त्यासाठी काही कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच १०० मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

दिंडी मार्गावर व मुक्कामाच्या ठिकाणी प्लॅस्टिक अथवा थर्माकोलचा वापर होणार नाही, या दृष्टीने नियोजनाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच दिंडी मार्गावर कचरा संकलनासाठी कर्मचारी व घंटागाडी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी अनुभवला मन:शांतीचा मार्ग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : शिंगी येथील संत तुकाराम माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास शालेय समिती सदस्य मा. बाबूलाल शेख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना जागतिक योग दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी योगाभ्यासाचे शारीरिक व मानसिक फायदे स्पष्ट करत प्राणायाम, विविध योगासने यांची माहिती दिली आणि विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष योगाभ्यासही करून घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संदीप सावंत यांनी तर आभार प्रदर्शन गोकुळ काकडे यांनी केले. या यशस्वी उपक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी समर्पितपणे मेहनत घेतली.

# छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये योगदिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील आंतरराष्ट्रीय योग दिन काल साजरा करण्यात आला.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यातर्फे आयोजित या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांना योगा विषयक प्रात्यक्षिके आणि त्याचे महत्त्व समजून सांगण्यासाठी अहिल्यानगर मधील आरंभयोगचे संस्थापक श्री गणेश कुलथे हे योगाचार्य लाभले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानसाधना पद्धती, हटयोग साधना, शरीर मन शुद्धी साधना अशा बऱ्याच विषयांची माहिती देऊन योगा प्रात्यक्षिके सर्वांकडून करून घेतली.



योग हा एक सखोल अभ्यास आहे ज्यामध्ये शारीरिक मुद्रा, ध्यान आणि नैतिक मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट आहेत. प्राचीन भारतात रुजलेली, ती व्यक्तीला परमात्म्याशी जोडण्याचा आणि सर्वांगीण कल्याण करण्याचा प्रयत्न करते. शारीरिक पैलू, विविध मुद्रांचा समावेश, लवचिकता आणि सामर्थ्य सुधारते.

शारीरिक आरोग्य, मानसिक व भावनिक स्पष्टता यांचे संतुलन राखण्यासाठी योगा अतिशय महत्त्वाचा असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर खर्डे सर यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख प्रा. पी. जी. निकम, डॉ. एम. के. भोसले, डॉ. व्ही. व्ही. पाटील, प्रा. ए. बी. काळे, श्री एन. एम. बुधवंत तसेच राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, प्रा. अमेय कुलकर्णी, प्रा. अक्षय कांबळे यांच्या समवेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. अक्षय देखणे यांनी करून दिला.

# अन्न प्रक्रिया उद्योग योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

## शैलेश देशमुख; बाभळेश्वरच्या कृषि विज्ञान केंद्रात प्रशिक्षण संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना या शेतकऱ्यांनी समजून घेत असताना प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेअंतर्गत स्थानिक उत्पादकांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. सुक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योगांना बँक कर्जाशी निगडीत एकुण पात्र प्रकल्प खर्चाच्या दहा लाख मर्यादेत ३५ टक्के कृषी विभाग यासाठी अनुदान मिळते. या योजनेचा पात्र लाभार्थ्यांनी लाभ घेऊन उद्योग क्षेत्रामध्ये शेती उद्योग क्षेत्रामध्ये पुढे जावे, असे आवाहन असे बाभळेश्वरच्या कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख




शास्त्रज्ञ देशमुख यांनी केले. अंतर्गत प्रधानमंत्री सुक्ष्म कृषि विज्ञान केंद्र,बाभळेश्वर अन्न प्रक्रिया उद्योग योजना यांविषयी तीन दिवसीय प्रशिक्षण आयोजित प्रशिक्षणात देशमुख बोलत होते. यावेळी के. के. मॅनेजमेंट सोल्युशेन उद्योजकता केंद्राचे कमलेश कोते, केंद्राचे शास्त्रज्ञ शांताराम सोनवणे, भरत दंवगे, डॉ. विठ्ठल विखे, डॉ. विलास घुले, डॉ. प्रियंका खर्डे, सज्जला लांडगे, कैलास लोढे आदीसह परिसरांतील शेतकरी उपस्थित होते. देशमुख म्हणाले की, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यम ातून आणि विविध यंत्रणेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रातून रोजगार निर्मिती व्हावी यासाठी केंद्राचे विशेष प्रयत्न हे सुरू आहेत. या प्रशिक्षणांतून शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी बरोबरच युवक युवतींनी सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना समजून घेत या माध्यमातून आपण व्यवसायाकडे वळावे, असे सांगत यासाठीचे तांत्रिक मार्गदर्शन आपल्याला कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

डॉ. विलास घुले यांनी भाजीपाला प्रक्रिया व मुल्यवर्धन त्यामध्ये भाजीपाला सुकविणे, फळप्रक्रिया यावर सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षण तज्ञ कमलेश कोते यांनी उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे कौशल्य, आवश्यक परवाने, त्याला लागणारी कागदपत्रे, क्षमता बांधणी, व्यवसायाच्या निगडीत महत्वाचे मुद्दे त्यामध्ये उत्पादित मालाचे ब्रँडिंग,मार्केटिंग, पॅकेजिंग, लेबलिंग यांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाने आभार प्रदर्शन डॉक्टर प्रियंका खर्डे यांनी केले.

# तणाव मुक्तीसाठी प्राणायाम, ध्यान करा

## संतोष थोरात; इंग्लिश स्कूलमध्ये योगदिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : खर्डा येथील रयत शिक्षण संस्थेच्या खर्डा इंग्लिश स्कूल खर्डा विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय व आर्ट ऑफ लिविंग परिवार खर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने आर्ट ऑफ लिविंगचे प्रणेते श्री श्री रविशंकर जी यांच्या प्रतिमेचे पूजन सहा. पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत, मुख्याध्यापक मुस्तफा सय्यद व आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक संतोष थोरात यांच्या हस्ते करून आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत



म्हणाले, योगामुळे शारीरिक, मानसिक व आत्मिक क्रिया बरोबरच बुद्धिमत्तेत वाढ होते. शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढून, आत्मज्ञान व एकाग्रता वाढून अंनर्गत मन शांत होऊन चित्त एकाग्र होते.

मोबाईलच्या व्यसनापासून मुलांनी दूर राहिल पाहिजे, असे मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सुरेश सोनवणे, पर्यवेक्षक लक्ष्मण गदादे, क्रीडा शिक्षक प्रा. रावसाहेब केंद्रे, प्रा. शिवशंकर ठाकरे, प्रा. रामनाथ ढाकणे, प्रा. तुकाराम विधाते, प्रा. मुक्तेश्वर फामदे, प्रा. गजानन मुकाडे, प्रा. कांतीलाल वसावे, प्रा. गणेश शिंदे, प्रा. रवींद्र कोरे, प्रा. बाळकृष्ण देशमुख, प्रा. विकास जाधव आदी उपस्थित होते.



# अध्यात्म

## ज्येष्ठाचं श्रेष्ठत्व

**भक्ती विशेष**

**स्वाती पेशवे**

**ज्येष्ठ महिन्यात जल आणि सूर्याची उपासना केल्यास चांगले परिणाम मिळतात असं सांगितलं जातं. त्यामुळेच या महिन्यात यासंबंधीची व्रतवैकल्यं अंगिकारली जातात. सकाळ-सायंकाळी सूर्यमंत्राचा जप केला जातो. विशेषत: रविवारी उपवास केला जातो. या महिन्यातील प्रत्येक मंगळवारी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. हनुमानाला तुळशीपत्रांचा हार अर्पण केला जातो. त्यानंतर नैवेद्य दाखवला जातो. ज्येष्ठ असा गजबजलेला असतो.**



हिंदू कालगणनेनुसार वर्षातील तिसरा महिना म्हणजे ज्येष्ठ. या काळात वैशाखवणव्याची धग कमी झालेली असली तरी पुरती शमलेली नसते. त्यामुळे ज्येष्ठाच्या प्रथम पर्वात सूर्याची प्रखरता अनुभवायला मिळते. सूर्याच्या या ज्येष्ठतेवरुनच या महिन्याला ङ्कज्येष्ठङ्ख या नावाने ओळखलं जातं. उष्णतेबरोबरच या मासाची नाळ जळाशी जोडलेली आहे. त्यामुळेच या काळात सूर्य आणि वरुणदेवाची उपासना केली जाते. ऋतूबदलाचा काळ असल्यामुळे या मासामध्ये वातावरणातील बदल प्रकर्षाने अनुभवायला मिळतो. प्रथम चरणात वातावरणाबरोबरच शरीरातील पाण्याचा स्तरही कमी होत असतो. त्यामुळे शरीरातील पाण्यासह जमिनीतील घटत्या जलस्तराची नोंद घेणं, पर्याप्त प्रमाण टिकवण्याच्या हेतूने काळजी घेणं आणि कार्यरत होणं गरजेचं ठरतं. मात्र पाऊसकाळ सुरू होताच काळजी मिटते आणि जलधारा झेलण्यात सृष्टीबरोबरच वृत्तीही तल्लीन होऊन जाते. म्हणूनच हा काळ एक वेगळीच सुखानुभूती देतो.

नव्या नव्हाळीचं निश्चितच एक महत्त्व असतं, वेगळं औत्सुक्य असतं. या दृष्टीने ज्येष्ठ पावसाची नव्हाळी अनुभवण्याची संधी देतो. घामाने चिंब झालेल्या एखाद्या दुपारी अचानक वातावरणात बदल होत असल्याचा अनुभव, त्यानंतर उधळणारा मृद्गंध, एक-दोन सरींनी न्हाऊमाखू घालताच गोमटेपणाने प्रफुल्लित आणि रसभरीत होणाऱ्या लता-वल्लरी, दाटून उरणारा कुंदपणा, रागाचा गंभीर विस्तार संपल्यानंतर एखाद्या गायकाने अथवा वादकाने द्रुतगतीने आविष्कार सादर करावा त्यासम वेग घेणारं धारानृत्य असे निसर्गाचे सगळे विभ्रम ज्येष्ठातच अनुभवायला मिळतात. म्हणूनच हा काळ एक वेगळी अनुभूती देऊन जातो.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे या महिन्यात जल आणि सूर्याची उपासना केल्यास चांगले परिणाम मिळतात. त्यामुळेच यासंबंधीची व्रतवैकल्यं अंगिकारली जातात. सकाळ-सायंकाळी सूर्यमंत्राचा जप केला जातो. विशेषत: रविवारी उपवास केला जातो. या महिन्यातील प्रत्येक मंगळवारी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. हनुमानाला तुळशीपत्रांचा हार अर्पण केला जातो. त्यानंतर नैवेद्य दाखवला जातो. या पुजेमुळे कुंडलीतील मंगळासंबंधीच्या समस्या दूर होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. ज्येष्ठ महिन्यात स्त्रियांचा आवडता वटपौर्णिमा हा सण येतो. साक्षात यमराजाबरोबर बुद्धिकौशल्याने संवाद साधून पातिव्रत्याच्या बळावर पतीचे प्राण परत आणणारी सावित्री ही आजही प्रत्येक स्त्रीचा आदर्श आहे. आज प्रत्येक महिला वडाची पूजा करत नसली तरी तिच्या मनातलं पतीविषयीचं प्रेम आणि त्याला साथ देण्याची वृत्ती जागोजागी दिसते. आजही प्रत्येक स्त्रीच्या रूपात त्याच पुराणकाळातील सावित्रीचा अंश वावरत आहे. फक्त तिचे संदर्भ बदलले आहेत एवढंच. अनेक ठिकाणी पतीच्या हयातीनंतर त्याची अर्धवट राहिलेली जबाबदारी पत्नी समर्थपणे पेलते आणि कडू-गोड आठवणींवर उर्वरित आयुष्य काढते. हा देखील अलीकडच्या काळातील सावित्रींच्या पातिव्रत्याचाच आदर्श म्हणायला हवा. कालमानानुसार भावना व्यक्त करण्याच्या पद्धती बदलत असतात. पण त्यामागील पतीप्रेम, निष्ठेची भावना ही पुराणकाळातल्या सावित्रीच्या मनातील भावनेसारखीच असते.

सध्याच्या सावित्री केवळ घराच्या पातळीवर लढतात असं नव्हे तर त्यांना वेगवेगळ्या आघाड्यांवर लढा द्यावा लागत आहे. ज्येष्ठ महिना अशा प्रत्येक महिलेला मानवंदना देतो.

ज्येष्ठ महिन्याला ऐतिहासिक महत्त्वही आहे. इतिहासातल्या शौर्याचं मूर्तीमंत प्रतीक असणाऱ्या महाराणा प्रताप यांची जयंती ज्येष्ठ महिन्यातच येते. सिंहाचा जबडा उघडून त्याचे दात मोजणाऱ्या निधड्या छातीच्या संभाजीराजांची जयंतीसुद्धा तिथीप्रमाणे ज्येष्ठ महिन्यातच आहे. विशेष म्हणजे त्याच्याच दुसऱ्याच दिवशी इतिहास घडवणारे, गुणसंपन्नतेचे शिरोमणी छत्रपती शिवाजीराजे यांचा शिवराज्याभिषेक दिन येतो. याच तिथीला किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेकाचा प्रेक्षणीय सोहळा पार पडला आणि त्यानंतर सुरू झाली ती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची मालिका आणि एका आदर्श राजाची यशस्वी कारकिर्द. आजही या दिवसाचा आठव अंगावर रोमांच उमटवून जातो. या निमित्ताने बहारदार कार्यक्रम पार पडतात.

शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊबाई यांचा स्मृतीदिनसुद्धा याच महिन्यात येतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिवाजी महाराजांसारखा सर्वगुणसंपन्न पराक्रमी राजा घडवणारी एक कुशल, परिपूर्ण माता म्हणून उभ्या महाराष्ट्राला जिजाऊंची आठवण आहे. त्यांच्या नावाने आदर्श मातांना पुरस्कारही दिले जातात. शिवाजीराजे भोसले यांच्या घराण्यातल्या या तीन थोर व्यक्तींची आणि त्यांच्या गुणांची आठवण या मासाच्या निमित्ताने येते. आदर्श जीवनाला परमेश्वर मानणारे, सतत सत्याची पूजा करणारे, प्रतिभावंत साहित्यिक आणि मुलांची आई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सानेगुरूजी यांचा स्मृतीदिन ज्येष्ठ महिन्यातच येतो. या सत्त्वशील, आदर्शवादी लेखकाने आपल्या लेखनातून समाजाला सतत उत्तम आणि पवित्र विचारांचे संदेश दिले. हे संस्कृतीरक्षक लेखक **श्यामची आई** सारख्या पुस्तकातून अजरामर आहेत. या निमित्ताने त्यांचीही आठवण येते.

सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असणारा दृष्टिदान दिन ज्येष्ठातच येतो. या दिवसामुळे नेत्रदानाच्या चळवळीला नवी गती मिळते. या मासातली आध्यात्मिक दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे क्षेत्र देहू येथून संत तुकारामांच्या पालखीचं प्रस्थान होतं. त्याच्याच दुसऱ्या दिवशी क्षेत्र आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचं प्रस्थान होतं. विठूमाऊलीचे अगणित भक्त या दिवसांची आतुरतेने वाट पाहत असतात. ते भक्तीभावाने पालखी सोहळ्यात सामील होतात. अशा तऱ्हेने पौराणिक, ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व लाभलेला ज्येष्ठ अनेक दृष्टींनी परिपूर्ण असतो. म्हणूनच तो ज्येष्ठ असतो.

## अमृतवाणी

रुणुझुणु रुणुझुणु रे भ्रमरा।
सांडी तू अवगुणु रे भ्रमरा।।
चरणकमळदळू रे भ्रमरा।
भोगी तूं निश्चळु रे भ्रमरा।।
सुमनसुगंधु रे भ्रमरा।
परिमळु विद्गदु रे भ्रमरा।।
सौभाग्य सुंदरू रे भ्रमरा।
बाप रखुमादेविवरू रे भ्रमरा

–संत ज्ञानेश्वर



## कालीमातेला नूडल्सचा नैवेद्य

**अजबगजब**

भारत हा श्रद्धाळूंचा, भाविकांचा देश आहे. पुराणकथा, आख्यायिका, दंतकथा आदींचा मोठा पगडा असणारा हा समाज ईश्वराचं अधिष्ठान मानणारा आहे. कुलदैवतांप्रमाणे प्रत्येकाची आपापली श्रद्धास्थानं असतात आणि इष्ट देवतांना प्रसन्न करुन घेण्यासाठी जो तो आपापल्या पद्धतीने करुणा भाकत असतो. देवाची आराधना करत असतो. असं असल्यामुळेच काही देवळांमध्ये अजबगजब प्रथा-परंपरा पहायला मिळतात. कोलकातामध्ये ङ्कचायनीज काली मंदिरङ्ख हे असंच एक स्थान आहे.



या पवित्र स्थळी कालीमातेची पूजा होते. पूजा संपन्न झाल्यानंतर देवाला नैवेद्य दाखवण्याची पद्धत आपल्याकडे आहे. नैवेद्य आणि आरती झाल्याशिवाय पूजा पूर्ण होत नाही. बरेचदा हा नैवेद्य पक्वान्नांचा असतो. स्नानादी आन्हिके आटोपून शुद्ध तना-मनाने रांधलेले पदार्थ देवापुढे ठेवतात, ते ग्रहण करण्याचा आग्रह केला जातो आणि त्याने ते ग्रहण केलं आहे असं समजून तो नैवेद्य प्रसाद स्वरुपात उपस्थितांमध्ये वाटला जातो. कालीमातेच्या या देवळातही नैवेद्य दाखवला जातो. मात्र तो गोडाधोडाचा नसून नूडल्स, चॉप्सी, शेजवान राईस अथवा भाज्या घालून तयार होणाऱ्या चायनीज पदार्थांचा असतो.

आश्चर्य वाटलं ना? पण हे अगदी खरं आहे. कोलकात्याच्या तंगरा नामक भागात चीनी लोकांची मोठी वस्ती आहे. बऱ्याच वर्षांपासून ते इथे राहतात. भारतीयांप्रमाणे तेदेखील कालीची मनोभावे पूजा करतात आणि त्यानंतर आपल्या खाद्यसंस्कृतीतील पदार्थ देवीला अर्पण करतात. त्यामुळेच कालीमातेचं हे मंदिर ङ्कचायनीज काली मंदिरङ्ख म्हणूनही ओळखलं जातं.



## काय देते विद्या?

**समर्थ उवाच**

विद्या व्यक्तीला उन्नत अवस्थेकडे नेते, मात्र विद्येचा सदुपयोग व्हायला हवा. सद्विद्याप्राप्त माणसाला परमार्थाची गोडी कळते. हे सविस्तर सांगताना श्रीसमर्थ म्हणतात,

**सत्यवचनी शुभवचनी। कोमळवचनी येकवचनी।**
**निश्चयवचनी सौख्यवचनी। सर्वकाळ।।**
**द्रव्यसुची दारासुची। न्यायसुची आंतरसुची।**
**प्रवृत्तिसुची निवृत्तीसुची। सर्वसुची नि:संगपणे।।**
**मित्रपणे परहितकारी। वाग्माधुर्ये परशोकहारी।**
**सामर्थ्यपणें वेत्रधारी। पुरुषार्थे जगमित्र।।**

सद्विद्या माणसाला शहाणं करते. अशा माणसाला श्रुती, स्मृती, उपनिषदे आदींचं ज्ञान असतंच त्याचबरोबर व्यवहारात सावधपणे आणि प्रसंग ओळखून कसं वागावं हेही तो जाणतो. कोणाला मानसन्मान देऊन आदर दाखवायचा आणि एखाद्या लबाड माणसाची लबाडी हुषारीने कशी ओळखायची हे त्याला बरोबर समजतं. सत्य आणि नेमकं बोलणारा, बोलल्याप्रमाणे कृती करणारा, चपळ, कौशल्यवान असा पुरुष आपली साधनवृत्ती आणि ज्ञानार्जनाची प्रवृत्ती कधीच सोडत नाही. आगम आणि निगम म्हणजेच शरीर आणि आत्मा यांच्या परस्परसंबंधाचं, जीवाशिवाच्या नात्याचं त्याला सूक्ष्म ज्ञान असतं. तो भक्तीसुद्धा अनेक मार्गांनी करत असतो. कधी तो पुरश्चरणं करतो तर कधी तीर्थयात्रा, कधी जप तर कधी शरीरकष्टाचं तप... मात्र साधनेचा मार्ग निश्चित असल्याने तो सदैव तृप्त आणि समाधानी असा योगीस्वरूप बनतो. मनातूनच विरागी झाल्यामुळे त्याचं वागणं-बोलणं सौम्य, शुद्ध, सात्विक आणि निष्कपट असतं. तो निर्व्यसनी असतो आणि या सद्गुणांमुळे लाभणारी मन:शांती त्याच्या मुखावरही झळकत असते. त्यामुळे त्याच्या दर्शनानेही सर्वांना निरातिशय प्रसन्नता लाभते.

असा वितरागी असूनही कला आणि संगीतात ज्ञान आणि रस घेणारा असतो. तो त्यांचं रसग्रहण करून स्वत: आनंदित होतो आणि इतरांनाही आनंद देऊन जातो. सौजन्यपूर्ण आणि निरपेक्ष वागल्यामुळे तो सर्वांनाच हवाहवासा वाटतो आणि जणु हा जिवलग मित्र आहे असंच सर्वांनाच वाटतं. तो नेहमी सत्य, शुभ, कोमलपणे बोलणारा आणि दिलेलं वचन न मोडणारा असतो. अशी व्यक्ती जनतेपुढे आदर्श वस्तुपाठ देते असं समर्थ म्हणतात.

## साधावा परमार्थ

**आत्मबोध**



द्वैतामध्ये दु:ख आहे तर अद्वैतामध्ये सुख आणि आनंद आहे. आपण अद्वैतामध्ये राहिलो तर आनंद मिळतो. मुळात हे जग एकच आहे. प्रपंच दहा दिशांना विस्तारतो पण परमार्थाची मात्र एकच दिशा असते. आपण तिच्याकडे लक्ष ठेवावं. काही न करणं (अर्थात मनाने) हा खरा परमार्थ होय. परमार्थामध्ये ङ्कमीङ्ख ला स्थान नाही. प्रपंच हा द्वैत आहे. त्याचं मोठं अवडंबर असणारच. जगण्याचा अंतिम हेतू कळत नाही तोपर्यंत प्रपंच करणं हेच ध्येय असल्याचं आपण समजतो. वास्तविक, मनुष्यप्राणी हा देह आणि मन या दोन्हीही मिळून बनला आहे. म्हणूनच त्याने ऐहिक आणि पारलौकिक अशा दोन्ही गोष्टी साधल्या पाहिजेत. परमार्थ साधणं हाच आपल्या जन्माचा खरा हेतू आहे. व्यवहारात द्वैताशिवाय आनंद नाही. म्हणून परमार्थात, मानसपूजेत सर्वप्रथम ङ्कमीङ्ख आणि ङ्कपरमात्माङ्ख अशा द्वैताने सुरुवात करावी लागते. परमार्थ हाडीमासी खिळत नाही तोपर्यंत आपल्याला वाचनाची गरज असते. त्यामुळे साधनेला नवं बळ मिळतं. मन भगवंताच्या ठायी कसं गुंतवायचं हे समजतं. त्यासाठी आपण काय करावं यासंबंधी मार्गदर्शन मिळतं.

एक बाप आपल्या मुलाला पोहायला शिकवत होता. प्रथम त्याने मुलाला घोट्याइतक्या पाण्यात आणलं, नंतर ढोपराइतक्या पाण्यात आणलं, नंतर आणखी पुढे आणलं आणि एक दिवस मुलाला पाण्यात खेचून घेतलं. या हुशार बापाप्रमाणेच गुरू आपल्याला परमार्थ शिकवत असतात. मात्र त्यासाठी पाण्यात उतरालायला तर हवं! देहाने प्रपंच केला पण तो फळाला येत नाही. म्हणूनच संतांनी नामस्मरणाचा मार्ग सांगितला आहे. पण आपला शहाणपणा, अभिमान, अहंकार आड येतो त्याला काय करावं? हा अभिमान दुसरा कुणी उत्पन्न करतो असं थोडंच आहे? आपल्या ध्यानातही येणार नाही इतकी वासनेची सूक्ष्म बीजं खोलवर कुठे तरी दडलेली असतात. त्यामुळे लौकिकाची अभिलाषा सुटत नाही. हे पाश तोडण्यासाठी संतांनी एक मार्ग सुचवला आहे आणि तो म्हणजे नामस्मरणात राहून विषयाची ऊर्मी उठू न देणं. प्रपंचातली विघ्नं सूचनावजा असतात. ती आपल्याला जागं करतात. आपण भगवंताला ओळखण्यासाठी जन्माला आलो आहोत याचा विसर पडू नये या हेतूने विघ्नांची योजना असते. भगवंताच्या जवळ नेण्यासाठीच विघ्ने येत असतात. तेव्हा त्यांना न घाबरता भगवंताच्या नामात स्वत:ला विसरून जाणं हा परमार्थाचा सोपा मार्ग आहे.

## दूर करा चिंता

**जीवनमंत्र**

**चिंता इतनी कीजिए की**
**काम हो जाए**
**पर**
**इतनी नहीं की**
**जिंदगी तमाम हो जाए**



किती योग्य सल्ला दिला आहे या कवीने... आपल्याला कुठल्या ना कुठल्या गोष्टीची काळजी लागून राहिलेली असते. कुठलीशी चिंता आतल्या आत पोखरत असते. चिंतेचं स्वरुप हलकं आहे की गंभीर, त्यामुळे चिंतीत व्हावं की सोडून द्यावं, त्याने जीवनावर नकारात्मक प्रभाव पडेल की फारसा फरक पडणार नाही हे आणि यासारखे मुद्दे व्यक्तीसापेक्ष असतात. त्यांना कुठलेही ठोकताळे लावता येत नाहीत की कोणत्या नियमांच्या निकषात बसवता येत नाही. त्यामुळे एखाद्याला करो या मरो चा प्रश्नदेखील दुर्लक्ष करण्याजोगा वाटतो तर एखाद्याला सगळी सुखं असतानाही छोटी चिंताही चितेसारखी जाळत राहते. म्हणूनच कवीने सांगितल्याप्रमाणे सजग रहावं आणि हाती घेतलेलं काम पूर्ण करावं. कामासंबंधीचा विचार आणि त्या अनुषंगाने येणारी चिंता निश्चितच करावी कारण ही चिंता कार्यप्रवण ठेवते. मात्र जगण्यातील रस संपवणारी चिंता दूर करणंच श्रेयस्कर...

## परब्रह्माचं 'अक्षर'स्वरुप

**बोल ज्ञानियाचे**

खालील ओवीतून ज्ञानेश्वरांनी परब्रह्माचं स्वरुप स्पष्ट करुन सांगितलं आहे. परब्रह्माचं स्वरूप अजोड, अतुलनीय असल्याचं माऊली सांगतात.

**जे ऐसेही परि विरुळे।**
**इथे विज्ञानाचिये खोळे।**
**हालवलेही न गळे।**
**ते परब्रह्म।।**

जीवनवस्त्र अत्यंत तलम असतं. ते अनेक धाग्यांनी विणलेलं असतं. पण हलवलं असताही या वस्त्रांमधून गळत नाही ते परब्रह्म होय, असं ज्ञानेश्वरमाऊली सांगतात. परब्रह्म हे सूक्ष्मातील सूक्ष्म आणि विशालातील विशाल आहे. अगदी फुटक्या खापरातही परब्रह्म आहे पण ते पाण्याप्रमाणे त्यातून गळून जात नाही. परब्रह्म हे अक्षर आहे. अक्षर म्हणजे क्षर नाही ते. मन शीतल होतं, कोणतीही शंका किंवा द्वंद्व उरत नाही तेव्हा परमज्ञानाची प्राप्ती होते. परमज्ञान हा परब्रह्म जाणून घेण्याचा मार्ग आहे. एकदा परमज्ञान प्राप्त झालं की परब्रह्माच्या अविनाशी स्वरुपाची ओळख पटते. ब्रह्म स्वयंभू आहे तर बाकी सर्व निर्माण करावं लागतं. त्यामुळेच इतर सगळ्या वस्तू क्षर आहेत, विनाशी आहेत तर परमात्मा अक्षर आहे.



या जड प्रकृतीपासून अक्षय परमात्म्याकडे जाणं निश्चितच सोपं नाही. त्याला ज्ञानसाधनेची जोड द्यावी लागते. त्यामुळेच परमज्ञानाची प्राप्ती करून घेणं गरजेचं ठरतं असं ज्ञानेश्वर माऊली सांगतात.

## मातृभक्तीचं प्रतीक मरिअम्मन मंदिर

**तीर्थाटन**

मातृभक्तीविषयी आपण खूप काही वाचतो, ऐकतो. पण मातृभक्तीला वाहिलेलं मंदिर सिंगापूरमध्ये आहे हे तुम्ही जाणता का? इथे असणारं मरिअम्मन मंदिर द्रविड स्थापत्यशैलीचा अद्भूत नमुना आहे. तामिळीयन भाविक नारायण पिल्लई यांनी १८२७ मध्ये हे मंदिर बांधलं. २०१० मध्ये मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. या मंदिराचं प्रवेशद्वार दक्षिणी गोपुरम शैलीत बांधलं आहे. गाभाऱ्यात माता मरिअम्मन विराजित आहे. भारताच्या ग्रामीण भागात मरिअम्मन मातेला मातृशक्तीचं प्रतीक मानतात. ही देवी आईच्या मायेने रोगराईपासून आपलं संरक्षण करते अशी भाविकांची श्रद्धा आहे. या मंदिराचे निर्माणकर्ते नारायण पिल्लई ईस्ट इंडिया कंपनीमध्ये कार्यरत होते. कंपनीने सिंगापूरमध्ये बस्तान बसवायचं ठरवलं. त्यावेळी अनेक हिंदू लोकही इथे स्थायिक झाले. त्यांना आराधना करता यावी या हेतूने हे मंदिर बांधण्यात आलं. पाऊस पडत नसल्यास या देवीची आराधना केली जाते. मंदिराच्या शिखरावर विविध हिंदू देवीदेवतांच्या प्रतिमा आहेत.

सिंगापूरमध्ये स्थित असणाऱ्या भारतीयांचं सर्वात महत्त्वाचं श्रद्धास्थान असणारं हे देऊळ भाविकांनी सतत गजबलेलं असतं. ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात इथे मोठा उत्सव पार पडतो. यावेळी भाविकांची मोठी गर्दी असते. एकूणच सिंगापूरला जाण्याचा योग आल्यास या मंदिराला भेट देण्यास विसरु नका.



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✲ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11